अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## भारत-इंग्लंड यांच्यात २५ जानेवारीपासून कसोटी मालिका

**मुंबई :** अफगाणिस्तानविरोधातील टी २० मालिकेनंतर भारतीय संघ मायदेशात इंग्लंडविरोधात पाच सामन्याची कसोटी मालिका खेळणार आहे. २५ जानेवारीपासून भारत आणि इंग्लंड यांच्यामध्ये कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे.

गेल्या महिन्यात इंग्लंड संघाने आपल्या संघाची घोषणा केली होती. लवकरच भारतीय संघाची घोषणाही होईल. भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान २५ ते २९ जानेवारी रोजी पहिला कसोटी सामना हैदराबाद येथे होणार आहे. त्यानंतर २ ते ६ फेब्रुवारी यादरम्यान विशाखापट्टणम येथे दुसरा सामना होणार आहे. राजकोटमध्ये तिसरा, रांचीमध्ये चौथा तर धरमशाला येथे सात ते ११ मार्च यादरम्यान पाचवा कसोटी सामना होणार आहे. पाच सामन्याच्या कसोटी मालिकेत इंग्लंडच्या ताफ्यात अनुभवी आणि युवा खेळाडूंचा भरणा आहे.

**इंग्लंडचा संघ** - बेन स्टोक्स (कर्णधार), रेहान अहमद, जेम्स एंडरसन, गस एटकिंसन, जॉनी बेयरस्टो (विकेटकीपर), शोएब बशीर, हॅरी ब्रूक, जॅक क्रॉली, बेन डकेट, बेन फॉक्स (विकेटकीपर), टॉम हार्टले, जॅक लीच, ओली पोप, ओली रॉबिन्सन, जो रूट आणि मार्क वुड.

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.९ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ९१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# महायुतीवर टांगती तलवार!

## बंद लिफाफ्यात काय दडलंय? शिंदे-ठाकरेंचं टेन्शन वाढलंय

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यातील महायुतीच्या सरकारवर टांगती तलवार असल्याचे भाकित वर्तवण्यात आली आहे. बुधवारी राज्यात राजकीय भूकंप होणार,असे विरोधी पक्षाचे नेते म्हणतात. आता युद्धाची तयारी सुरू झाली आहे. या तयारी दरम्यान वेगवेगळ्या वावड्या उठू लागल्या आहेत. कोणी काहीही सांगते. काहीजण विचारत आहेत तुमचे (शिंदे गट) १० जानेवारीला काय होणार? माझे त्यांना एकच उत्तर आहे. ते आमचे आम्ही बघू. आम्हाला श्रद्धांजली अर्पण होणार की, आम्ही शहीद होणार ते आम्ही बघू. तुम्ही त्याची काळजी करू नका,अशा शब्दात महायुतीच्या एका मंत्र्याने विरोधकांना ठणकावले आहे.निमित्त आहे,१६ अपात्र आमदारांच्या निकालाचे. कोर्टाच्या निर्देशानुसार बुधवारी सभापती राहुल नार्वेकर यांना याचा निकाल जाहीर करावा लागणार आहे तेव्हा नार्वेकरांच्या बंद लिफाफ्यात काय दडलंय? त्याबद्दल राज्यात उत्सुकता पसरली असून शिंदे व ठाकरे गटाचे टेन्शन वाढले आहे.**

केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे लक्ष १० जानेवारीच्या निकालाकडे लागले आहे. शिवसेना आमदार अपात्रतेचा ऐतिहासिक निर्णय विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर बुधवारी देणार आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतर चाळीस आमदार एकनाथ शिंदेंसोबत गेले. तत्पूर्वी काही कायदेशीर प्रक्रिया झाल्या आणि विधानसभेतील तत्कालीन उपाध्यक्षांकडे १६ आमदारांना अपात्र करण्याची नोटीस पाठवण्यात आली होती. तेव्हापासून हे प्रकरण कोर्टात होते. पुढे सुप्रीम कोर्टात या प्रकरणाची बरीच चर्चा झाली आणि अखेर ११ मे २०२३ रोजी सुप्रीम कोर्टाने ऐतिहासिक निकाल देत आमदार अपात्रतेचा चेंडू विधानसभाध्यक्षांच्या कोर्टात पाठवला. विधानसभाध्यक्ष नार्वेकर मुख्यमंत्र्यांच्या भेटीला नार्वेकर हे आजारी असूनही रविवारी वर्षा बंगल्यावर दाखल झाले. नार्वेकर आणि मुख्यमंत्र्यांची भेट ठरलेली नव्हती. परंतु अचानक त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. नार्वेकर यांनी रविवारी वर्षा निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीमागचे कारण उघड झाले नसल्याने तर्कवितर्कांना उधाण आले आहे. सर्वोच्च न्यायायलाच्या निर्देशांनुसार शिवसेना आमदार अपात्रप्रकरणी नार्वेकर यांनी १० जानेवारीपर्यंत निर्णय देणे अपेक्षित आहे. मात्र या निकालापूर्वीच नार्वेकर हे आजारी पडल्याने त्यावरून विरोधकांनी उलटसुलट प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली आहे.



### ... तर मुख्यमंत्रिपद अडचणीत

शिवसेना आमदारांच्या अपात्रतेचा निकाल १० जानेवारी रोजी येणार आहे. नार्वेकर हेच यावर निर्णय देणार आहेत. अपात्र आमदारांच्या यादीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही समावेश आहे. हा निकाल शिंदे गटाच्या विरोधात गेल्यास त्यांचे मुख्यमंत्रिपद अडचणीत येऊ शकते व त्यातून राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण होऊ शकते. त्यापूर्वीच नार्वेकर यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली,असे राजकीय जाणकार सांगतात.

### अवघा एक दिवस...

नार्वेकर यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत निर्णय देण्याचा आदेश दिला आहे. त्याप्रमाणे १० जानेवारीला ही मुदत पूर्ण होत आहे. त्यामुळे विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर काय निर्णय घेतात, याकडे राज्यासह देशातील सर्व राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. अपात्रतेच्या निकालाला उरले अवघा एक दिवस.

### काळजी करू नका...

शिवसेनेच्या दोन्ही गटांमधील (ठाकरे गट आणि शिंदे गट) आमदारांची धाकधुक वाढली आहे. अशातच शिंदे गटातील नेते तथा राज्याचे पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आमदार अपात्रतेवरून सातत्याने विचारल्या जाणाऱ्या प्रश्नावर प्रतिक्रिया दिली आहे.आगामी लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेनेच्या शिंदे गटाने जळगावात कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक बोलावली होती. मंत्री गुलाबराव पाटलांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीवेळी गुलाबराव पाटील शिंदे गटातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना म्हणाले, आता युद्धाची तयारी सुरू झाली आहे. या तयारीदरम्यान वेगवेगळ्या वावड्या उठू लागल्या आहेत. कोणी काहीही सांगतं. काहीजण विचारत आहेत तुमचं (शिंदे गट) १० जानेवारीला काय होणार? माझं त्यांना एकच उत्तर आहे. ते आमचं आम्ही बघू. आम्हाला श्रद्धांजली अर्पण होणार की, आम्ही शहीद होणार ते आम्ही बघू. तुम्ही त्याची काळजी करू नका.

### काय म्हणाले पृथ्वीराज चव्हाण?

काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी या संदर्भात मोठे विधान केले आहे. ते म्हणाले की-पक्षांतरबंदी कायद्याचे १०० टक्के उल्लंघन झालेले आहे. विधानसभेचे अध्यक्ष एका पक्षाचे आमदार आहेत. ते पक्षाच्या हिताच्या विरोधात निर्णय देतील का? जो काही निर्णय होईल, तो पूर्णपणे राजकीय असेल. तो निर्णय कायद्याला धरून नसेल. कायद्याला सोडून जर निर्णय झाला, तर सर्वोच्च न्यायालय काय करणार हा प्रश्न आहे. त्यानुसार राजकारणाची बरीच समीकरणं पुन्हा लिहावी लागतील. पहिला भूकंप नार्वेकर काय निर्णय घेतात यावर ठरणार आहे. ते यातून अंग काढून घेण्याचीही शक्यता आहे. कारण कुणी म्हणतं राजीनामा देतील, कुणी म्हणतं आजारी पडतील, कुणी म्हणतं वेळ वाढवून मागतील. त्यांनी जर त्यातून अंग काढलं आणि निर्णय घेतला नाही, तर मग त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाला पहिला निर्णय घ्यावा लागेल. तो पहिला राजकीय भूकंप असेल.

---

## अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकलस्वार ठार

सुराज्य/मोहोळ

अज्ञात वाहनाने मोटार सायकलला धडक दिल्याने युवकाचा मृत्यू झाला ही घटना सोमवारी दुपारी दीड वाजणेच्या सुमारास स्वातंत्र्य सेनानी संदीपान गायकवाड मंगल कार्यालयासमोर घडली

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहीती नुसार याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहीती नुसार करण बब्रुवान साबळे (वय २५ वर्षे रा.सावळेश्वर) हा त्याच्या मोटारसायकल क्र. एमएच १३ ई.ई. ८५६५ वरुन मोहोळ ते सोलापूर हायवे रस्त्यावरुन सावळेश्वरकडे जातअसताना, गायकवाड मंगल कार्यालय समोर आल्यानंतर त्याचे पाठीमागुन अज्ञात वाहण चालकाने हयगयीने, भरधाव वेगात गाडी करणच्या गाडीला पाठीमागुन धडक दिली. त्यामध्ये करण साबळे हा सिमेंट कटट्यावर जावुन पडला त्यामध्ये त्याचे डोक्याला जोरात मार लागुन तो जखमी होवुन मयत झाला आहे. यामुळे त्या अज्ञात वाहन चालकाविरोधात मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करित आहेत.

## खुडूसमध्ये घरफोडी; ६० हजारांची चोरी

**सोलापूर :** खुडूस (ता.माळशिरस) येथे उघड्या घरातून प्रवेश करून चोरट्याने कपाटातील २० हजार रुपये रोख आणि ३० ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले.ही चोरी रविवारी घडली.

याप्रकरणी अभिजीत नानासाहेब पांढरे (रा. खडूस) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या वडिलांच्या खोलीच्या दरवाजा उघडा होता. पहाटेच्या सुमारास चोरटा दरवाजातून घरात प्रवेश केला. आणि कपाटातील रोख रकमेसह ६० हजार रुपयांचे दागिने चोरून नेले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे

## महाराष्ट्रात सर्वाधिक बोगस कंपन्यां चा भांडाफोड

सुराज्य/मुंबई





केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी डिसेंबर २०२३ पर्यंत जीएसटी अधिकाऱ्यांनी देशात २९,००० हून अधिक बनावट कंपन्यांचा पर्दाफाश केला. या कंपन्या ४४,०१५ कोटी रुपयांच्या बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट दाव्यांमध्ये गुंतल्या होत्या. या कंपन्या महाराष्ट्र, दिल्ली, राजस्थान, हरियाणासह अन्य राज्यांत पकडल्या गेल्या.

ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीत केलेल्या कारवाईत पकडण्यात आलेल्या बहुतांश बनावट कंपन्या महाराष्ट्रात असल्याचेही समोर आले. आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात ९२६ कंपन्या होत्या. यानंतर राजस्थानमध्ये ५०७, दिल्लीत ४८३ आणि हरियाणातील ४२४ कंपन्यांची बनावट जीएसटी नोंदणी होती. अर्थ मंत्रालयाने बनावट कंपन्यांचा पर्दाफाश करण्याबरोबरच या काळात जीएसटी अधिकाऱ्यांनी या प्रकरणात ४१ जणांना अटक केल्याचेही सांगण्यात आले आहे. त्यापैकी ३१ केंद्रीय जीएसटी अधिकाऱ्यांनी केले आहेत. बनावट जीएसटी नोंदणीविरोधात सरकारने सुरू केलेल्या मोहिमेचा परिणाम दिसून येत आहे.

गेल्या वर्षी २०२३ च्या आठ महिन्यांत या संदर्भात केलेल्या कारवाईची आकडेवारी अर्थ मंत्रालयाने सादर केली आहे. त्यानुसार बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट दाव्यांमध्ये गुंतलेल्या २९, २७३ कंपन्या आढळून आल्या आहेत. सरकारने सादर केलेली ही आकडेवारी डिसेंबर महिन्यापर्यंतची आहे. वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतही ४००० हून अधिक कंपन्या पकडल्या गेल्या.

## 'आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे'

### बिअर बारवर असे बोर्ड लावावेत, आरोग्य मंत्र्यांची सूचना

सुराज्य/धाराशिव

राज्यातील व्यसनाधीनता कमी करण्यासाठी विविध शासकीय संस्था, स्वयंसेवी संस्थांकडून प्रयत्न केले जात आहेत. आता तरुणाईला दारुच्या व्यवसनापासून दूर करण्यासाठी बिअर बार, परमिट रुमवर फलक लावण्याची सूचना राज्याचे आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी केली आहे.

'आरोग्य तरुणांईचे, वैभव महाराष्ट्राचे' असे बोर्ड लावावेत अशी सूचना आरोग्य मंत्र्यांनी केली आहे. धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे ५० खाटाचे रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत बोलत होते. त्यांनी म्हटले की, आजच्या स्पर्धेच्या युगात सध्या तरुणाई नैराश्याकडे जात आहे. युपीएससी, एमपीएसी स्पर्धा परीक्षा अपयश, शिक्षण, व्यवसाय यात अपयश आले की तरुणाईला एकच तोडगा दिसतो, तो म्हणजे परमिट रूम व बिअर बार. म्हणून मी आरोग्य विभागाला आवाहन करतो की आरोग्य विभागाने ज्या ज्या ठिकाणी परमिट रूम आणि बिअर बार आहेत त्या ठिकाणी 'आरोग्य तरुणांईचे,



वैभव महाराष्ट्राचे' असे बोर्ड लावावेत असे सांगत डॉ.सावंत यांनी नवीन संकल्पना मांडली. जेव्हा आपण मनापासून लढतो तेव्हा आपले कर्म व प्रारब्ध साथ देते असे सांगत राज्याचे आरोग्य मंत्री डॉ.सावंत यांनी आरोग्य तरुणांईचे, वैभव महाराष्ट्राचे ही संकल्पना मांडली, बिअर बार समोर असे बोर्ड लावा असे आवाहन केले.

## बुधवारपेठ येथे गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/मोहोळ

बुधवार पेठ परिसरातील डॉ. आंबेडकर नगर) येथे राहणाऱ्या अतिश किसन बनसोडे (वय ३८) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.



आतिश बनसोडे याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी हुकाला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत १० वाजेच्या सुमारास आढळून आला. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली असूनकारण समजले नाही.

## गडगीनगर येथे मारहाण करुन खिशातील रोकड लुटली

**सोलापूर :** कामावरून घरी जात असताना दुचाकी अडवून बियरच्या बाटलीने मारहाण करीत खिशातील रोकड लुटल्याची घटना एमआयडीसी परिसरातील गडगी नगर येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. लक्ष्मण अंबादास चिक्कलगी आणि त्याचा मित्र रितेश (दोघे रा. किसान नगर अक्कलकोट रोड) अशी जखमींची नावे आहेत.

त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते दोघे काल रात्री काम आॅटोपवून दुचाकीवरून घराकडे निघाले होते. येथील राज बियर शॉपी जवळ राहुल पाटील आणि बाँड नावाच्या व्यक्तीने त्यांची दुचाकी अडवून खिशातील रोकड काढून घेतली. त्यानंतर काचेच्या बाटलीने डोक्यात मारून जखमी केले. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



साहेब, तुम्ही आपल्याच पक्षावर टीका करत आहात !

कल्याण
467-73-238

मुंबई
279-85-500

## 'लोकल बॉडी' च्या निवडणुकांसाठी २०२५ साल उजाडणार?

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात लोकल बॉडीच्या निवडणुका आणखीन लांबणीवर पडण्याची शक्यता दिसत आहे.न्यायालयीन प्रक्रियेला विलंब होत असल्याने ह्या निवडणुका होण्यास २०२५ साल उजाडेल, असे चित्र दिसत आहे.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार हा प्रश्न आजही अधांतरीच राहिला आहे. या प्रकरणावर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. पण या दिवशी हे प्रकरण न्यायालयाच्या कामकाजासाठी आले नाही. यावरची सुनावणी यावरची सुनावणी ४ मार्चला होण्याची शक्यता आहे.**

मुंबई पुण्यासह राज्यातील २५ पेक्षा अधिक महापालिका, २०७ नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचे भवितव्य





या सुनावणीवर अवलंबून आहे. गेल्या काही महिन्यांपासून या निवडणुकांबाबत सातत्याने तारीख पे तारीख असेच चित्र पाहायला मिळत आहे, पण कोणतेही कामकाज होत नाही. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय खंडपीठासमोर क्रमांक आठवर हे प्रकरण सुनावणीसाठी होते. पण सोमवारी यावर सुनावणी झालेली नाही. ऑगस्ट २०२२ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संपूर्ण प्रकरणाची उत्सुकता महाराष्ट्राला आहे. या एका याचिकेवर २३ महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा आणि २०७ नगरपालिका, पंचायत समित्यांचं भवितव्य अवलंबून असणार आहे. याव्यतिरिक्त ९२ नगरपरिषदांमधल्या ओबीसी राजकीय आरक्षणाचाही मुद्दा अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या ही सुनावणी अत्यंत महत्त्वाची आहे.

सुप्रीम कोर्टाच्याच २००६ च्या आदेशानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांचा कालावधी जास्तीत जास्त ६ महिने लांबवता येऊ शकतो. त्यानंतर निवडणुका या व्हायल्याच हव्यात. आता गेल्या दोन-तीन वर्षांपासून महाराष्ट्रातल्या या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. सगळा कारभार प्रशासकांच्या हातात गेला आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर पुढची तारीख कधी पडते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### कारभार प्रशासकांच्या हाती

कोविड महामारीचं संकट, त्यानंतर राज्यात सुरु झालेला सत्तासंघर्ष, शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेली फूट यामुळे राजकीय घडामोडी वेगाने सुरु आहेत. राज्यातील अनेक महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषदांचा कालावधी अनेक महिन्यांपूर्वीच संपला आहे. त्यामुळे इथला संपूर्ण कारभार प्रशासकांच्या हाती आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याची उत्सुकता सगळ्यांनाच लागली आहे.

### भवितव्य अधांतरिच

२०२० मध्ये कोल्हापूर, औरंगाबाद,नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण डोंबिवली महापालिकांची मुदत संपली होती. तर, पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, नवीमुंबई या महापालिकांची मुदत २०२२ मध्ये संपली. बिग बझेट असलेल्या या महापालिकांवर दोन वर्षांपासून प्रशासक राज आहेत. तब्बल २७ हून अधिक महापालिका, २०७ नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे भवितव्य अंधांतरीच आहे.

# इच्छाशक्तीचा अभाव

महाराष्ट्रातले बहुतांश उद्योग राज्याबाहेर जात असताना आता महानंद दुग्धव्यवसायसुद्धा दिला जात आहे. विशेषतः गुजरातला पायघड्या घालायच्या यासाठीच हा निर्णय राज्य सरकार घेत आहे. गुजरातमधील अमूलच्या प्रगतीच्या कथा येत असताना महाराष्ट्रातही स्वतःचा ब्रँड असावा, अशी मागणी जोर धरू लागली. त्याला मराठी अस्मितेची किनार होती. त्यातून १९८३ च्या सुमारास 'महानंद' हा ब्रँड सुरू झाला. परंतु सुरुवातीपासूनच त्याला खोडा घालण्याचा प्रयत्न डेअरी क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेपामुळे सुरू झाला होता. महानंद दूध सहकारी संघांची शिखर संस्था असतानाही त्या छत्राखाली आणि ब्रँडखाली सर्व सहकारी दूध उत्पादकांनी येण्यास नकार दिला. जिल्हा दूध संघांना राजकीय फायद्यासाठी स्वतःची जहागीरदारी टिकवायची होती. अमूलने महाराष्ट्रात विक्री आणि त्यासोबत खरेदी सुरू केली तेव्हा सुरुवातीला अमूल, गुजरात दूध संघ दूध खरेदीला अधिक भाव देत असल्यामुळे सहकारी दूध संघाचा विरोध तर शेतकऱ्यांचा पाठिंबा होता, तेव्हाही या दूध संघाने प्रगतिशील धोरण अवलंबले नाही. एनडीडीपीच्यामार्फत आधुनिकीकरणासाठी मिळालेल्या निधींचा गैरवापर करणे, कट मिळवणे याकडेच सर्व दूध संघांचे लक्ष होते आणि त्यातून संचालकांच्या तिजोरी भरण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झाले. मुंबईमध्ये बराच काळ आरे हा ब्रँडसुद्धा सुप्रसिद्ध होता परंतु हळूहळू जमिनीत रस निर्माण झाल्यामुळे तो संपवण्याचे काम केले गेले. आताही अनेक सहकारी दूध संघांच्या ताब्यात मोक्याच्या जागा आहेत. त्यामुळे अनेक राजकीय व्यक्ती त्यावर लक्ष ठेवून आहेत.



दूध संघावर आपला ताबा असणे हे साखर कारखान्यावर ताबा असण्याइतकेच महत्त्वाचे ठरू लागल्यामुळे त्यामध्ये प्रशासकीय कौशल्यापेक्षा राजकीय हस्तक्षेप हाच निर्णायक झाला आहे. आजही महाराष्ट्रातील कात्रज डेरी, गोकूळ डेरी असे अनेक ब्रँड असताना त्यांना अमूलएवढे यश मिळत नाही याला प्रशासकीय अपयश आणि राजकीय हस्तक्षेप हीच महत्त्वाची कारणे आहेत. इतर राज्यांमध्ये म्हणजे कर्नाटकमध्ये नंदिनी, गुजरातमध्ये अमूल, मध्यप्रदेशमध्ये सांची, केरळमध्ये मिल्मा असे भरभराटीस आलेले ब्रँड आहेत. देशभरात एकूण १४ राज्यांमध्ये राज्यस्तरीय दूध संघ आहेत. अमूल ब्रँड असलेल्या गुजरात दूध फेडरेशनच्या प्रशासनामध्ये शेतकऱ्यांचा निर्णय आणि व्यावसायिक तज्ज्ञ, व्यवस्थापक आहेत तर महाराष्ट्रातील महानंद संघांमध्ये मात्र मुलकी अधिकारी हेच व्यवस्थापकीय संचालक आहेत. या अधिकाऱ्यांच्या सततच्या बदल्या हा सुद्धा अडचणींचा मुद्दा आहे. जंबो संचालक मंडळ असलेल्या महानंदमधील संचालकांचे स्वतःचे दूध ब्रँड आहेत. त्यामुळे त्यांचे हितसंबंध महानंदच्या वाढीला अडसर ठरत आहेत. असे असताना महाराष्ट्रातील सरकार मात्र उपाययोजना करण्यास तयार नाही. त्यामुळे आज महाराष्ट्राला आपली स्वतःची अस्मिता असलेला महानंद ब्रँड एनडीडीबीकडे सोपवावा लागतो आहे. या सर्व अपयशाचे खापर गेल्या दहा वर्षातील मुख्यत्वे भाजप सरकार त्याचबरोबर या काळात सत्तेमध्ये असलेले सर्वांवर जाते. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून 'महानंद' हा ब्रॅण्ड कायम ठेवावा, केवळ व्यवस्थापन जबाबदारी एनडीडीबीला द्यावी. महासंघावर तज्ज्ञ व्यवस्थापन असावे, संचालक मंडळ छोटे असावे. संचालकांच्या स्वतःच्या खासगी दूध संस्था नसाव्यात. एनडीडीबीने पाच वर्षात महानंदला तोट्यातून बाहेर काढावे ही पूर्वअट असावी. सरकारने त्यानंतर महानंद पुन्हा ताब्यात घ्यावी. या बाबी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना न्याय देतील, असे जाणकारांचे म्हणणे आहे. मधल्या काळात अडचणीत सापडलेल्या राज्य सहकारी दूध संघ अर्थात 'महानंद'ची आर्थिक परिस्थिती आता सुधारत असल्याचे २०२१ची माहिती आहे. ठाकरे सरकारच्या काळात घेण्यात आलेले विविध निर्णय यासाठी उपयुक्त ठरल्याचे सांगितले जाते. 'आरे ब्रँड'ची काही उत्पादने 'महानंद'मध्ये तयार करण्याचे काम मिळाले होते. संरक्षण मंत्रालयासोबत दूध खरेदी करारही झाला. त्यानुसार सैन्य दलांना महानंदमधून दूध पुरवठा केला गेला. ठाकरे सरकार गेल्यानंतर महानंदला पुन्हा घरघर लागली. 'महानंद' प्रकल्प बाहेर गेल्यास महायुती सरकारच्या इच्छाशक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण होतील.

सामाजिक

# वाहनांची वाढती संख्या चिंताजनक

आपल्या देशात काही वर्षांपासून लोकसंख्येच्या प्रमाणात मोठ्या शहरात तसेच महानगरांमध्ये वाहनांची संख्या तितक्याच प्रमाणात दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. प्रत्येक शहरात अपुरे रस्ते आणि पार्किंगची सोय पुरेशी उपलब्ध नसल्यामुळे माणसांपेक्षाही जास्त जागा व्यापणाऱ्या या वाहन समस्येवर कुठले उपाय शोधायचे, असा मोठा प्रश्न सरकार समोर निर्माण झाला आहे. एकीकडे स्मार्ट सिटी आणि खेड्यांच्या विकास सरकारी स्तरावर होत आहे. आज नागरिकरणाची आवश्यकता जरी असली तरी लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये तिथल्या सोयीसुविधांचादेखील गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. आज देशाची लोकसंख्या १४० कोटींच्यावर गेलेली आहे; पण त्या प्रमाणात विशेषकरून महानगरात कोटींच्यावर वाहनांची संख्या गेली आहे; पण पुरेसे रस्ते आणि पार्किंगची सोय उपलब्ध नाही. जी भविष्यात अतिशय चिंतेची बाब ठरणार असल्याचे चित्र दिसते. याकरिता वाहन संख्येवर मर्यादा आणण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही.

भारत आता जगाचा विचार करता दुचाक्यांच्या बाबतीत अग्रक्रमांकावर जाऊन बसला आहे. त्यानंतर क्रमांक लागतो तो इंडोनेशियाचा. प्रवासी कार्सच्या विभागात आपण आठव्या क्रमांकावर असून चीन, अमेरिका नि जपान हे पहिल्या तीन क्रमांकांचे मानकरी आहेत. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत मिळून २०२० मध्ये भारतात ३२.६३ कोटी वाहने आणि त्यापैकी जवळपास ७५ टक्के दुचाकी वाहने होती. गेल्या तीन वर्षांत दोन कोटींहून अधिक वाहनांची नोंदणी झाली असून २०२३च्या जुलैपर्यंत एकूण संख्या पोहोचली होती ३४.८ कोटींच्या घरात.

सरकारी आकडेवारीनुसार, जुलै २०२३ पर्यंत सर्वाधिक नोंदणीकृत वाहने होती ती महाराष्ट्रात (३.७८ कोटी). त्यानंतर उत्तरप्रदेश (३.४९ कोटी) आणि तामिळनाडूचा (३.२१ कोटी) क्रमांक लागला होता. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये दिल्ली जवळपास १.३२ कोटी नोंदणीकृत वाहनांसह पहिल्या तर बेंगळूर दुसऱ्या स्थानावर आहे.



मुंबईतील दुचाक्यांची संख्या मागील वर्षातील आकडेवारीनुसार २७ लाखांवर पोहोचली आहे. ही घनता प्रति किलोमीटर १ हजार ३५० इतकी असून देशाचा विचार करता हे प्रमाण सर्वाधिक आहे. शहरांतील घनतेच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर विसावलंय ते २४.५ लाख दुचाकी वाहनांसह पुणे शहर. सदर प्रमाण प्रति किलोमीटर १ हजार ११२ दुचाक्या इतके. त्या तुलनेत चेन्नई, बेंगळूर, दिल्ली आणि कोलकाता येथील घनता प्रति १ हजारापेक्षा कमी आहे. गेल्या वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत बंगळुरुमध्ये एकूण १.१ कोटी वाहने होती. शहरातील वाहनांच्या संख्येनं २०१२-१३ मधील ५५.२ लाखांवरून ही झेप घेतली. याच कालावधीत कर्नाटकातील नोंदणीकृत वाहनांची संख्या जवळपास १.५ वरून उड्डाण करून ३ कोटींहून अधिक झाली.

गोवा हे छोटेसे राज्य असले तरी अनेक बाबतींत आघाडीवर असून त्यापैकी एक म्हणजे प्रत्येक घरामागं दुचाक्या नि कार्सच्या मालकीचं प्रमाण! राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार, सर्व भारतीय कुटुंबांपैकी ७.११ कुटुंबांकडे चारचाकी वाहने तर ४९.५७ टक्के कुटुंबांकडे दुचाकी आहे. मात्र, गोव्यातील ४५.२ टक्के कुटुंबांच्या दारात कार, तर ८६.५७ टक्के कुटुंबांच्या घरासमोर दुचाकी दिसते. चारचाकी वाहनांच्या बाबतीत २४.२ टक्क्यांसह केरळ, तर दुचाक्यांचा विचार करता ७५.६ टक्क्यांसह पंजाब दुसऱ्या क्रमांकावर आहे.

भारतातील महानगरांचा विचार करता कार्सचं सर्वाधिक प्रमाण (किलोमीटरमागं घनता) दिसून येतं ते पश्चिम बंगालची राजधानी असलेल्या कोलकाता शहरात. हा आकडा प्रति किलोमीटर २ हजार ४४८ इतका मोठा आहे. या पार्श्वभूमीवर रहदारी मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळं या शहरातील प्रवास आता जास्त वेळ खाऊ झाला आहे. गेल्या पाच वर्षांत एका फेरीसाठी लागणाऱ्या वेळेत दुप्पट वाढ झाली आहे. कोलकात्यात आता जवळपास ४५.३ लाख वाहनं रस्त्यांच्या १ हजार ८५० किलोमीटर क्षेत्रातून धावताना दिसतात. दिल्लीत जरी त्याहून जास्त वाहने (१ कोटी ३२ लाख) असली, तरी तेथील रस्त्यांचे क्षेत्र हे कोलकाताहून तिप्पट म्हणजे ३३ हजार १९८ किलोमीटर इतकं आहे. यामुळे देशाच्या राजधानीतील घनता प्रति किलोमीटर ४०० पेक्षा कमी आहे. सध्या कोलकात्यात ६.५ लाख दुचाक्या आहेत.

कोरोना काळानंतर भारतात वाहन खरेदी मोठ्या प्रमाणात वाढली आहे हे खरे आहे. तिथूनच वाहन खरेदीचा सपाटा लागला आहे. सध्या भारतात वाहन क्षेत्राला विलक्षण तेजी आली आहे. भारतीयांच्या खिशात खुळखुळणारा पैसा, बदलत्या परिस्थितीनुसार पदरी दुचाकी वा कार असण्याची वाढती गरज, युवावर्गाची नि धनिकांची महागड्या वाहनांची 'क्रेझ' यामुळं दिमाखात दारापुढे वाहन झळकणाऱ्या घरांची संख्या वधारत चालली आहे. त्यामुळे रस्त्यांवर माणसं कमी नि वाहनं जास्त असं चित्र उभं राहू लागलेलं असून त्यातूनच वाट काढत जायचं कसं हा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मात्र, उद्याच्या भारतासाठी हे धोकादायक आहे. प्रदूषणाने सध्या कळस गाठला आहे. त्यामुळे आता उलटी गिणती करण्याची वेळ आली आहे. सार्वजनिक वाहनांचा वापर वाढवण्याची आणि त्याला प्रोत्साहन देण्याची गरज निर्माण झाली आहे. वैयक्तिक वाहनांची संख्या वाढू नये यासाठी नियमावली आवश्यक आहे.

वाहन हे गरज म्हणून घेतले जाते की, आपल्याकडे असलेल्या पैशाचे किंवा श्रीमंतीचे प्रदर्शन माडण्यासाठी घेतले जाते याचादेखील विचार करण्याची वेळ आली आहे. माझ्याकडे पैसा आहे म्हणून मी चार चार, पाच पाच वाहने घेईन आणि जो त्याच पैशामुळे एकही वाहन होऊ शकत नाही अशा सामान्य माणसाला चालण्यासाठीदेखील जागा मिळणार नाही, असे जर त्याचे प्रमाण होत असेल तर वाढती वाहने ही सुविधा ठरण्याऐवजी एक मोठी समस्याच म्हणावी लागेल.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत**

टुडेज् ब्लॉग

# प्रतिभेवर भर देणारे शिक्षण हवे

जगभरात अशा कितीतरी शाळा आहेत की, ज्यांनी आपल्या वर्गखोल्या प्रयोगशील करून खऱ्या अर्थाने शिक्षणात क्रांती घडवून आणली आहे. कोणत्याही छोट्या-मोठ्या चर्चेच्या पलीकडे जात काही विचारवंत खरोखरंच परिवर्तनाच्या दृष्टींने पावलं उचलतात आणि इतिहास घडू लागतो. या शाळांची कार्यप्रणाली पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांनी समजून घेतली आणि त्या दिशेने पावलं टाकली तर प्रत्येक मूल अद्वितीय घडू शकतं. बऱ्याच शाळांनी या सिस्टीममध्ये राहून स्वत:मध्ये असे काही बदल घडवून आणले की ज्यातून गुणवत्ता सुधारली. हे बदल नक्की काय आहेत? हे बद्दल सार्वत्रिक होऊ शकतात, फक्त त्याची माहिती तुमच्यापर्यंत पोहचली पाहिजे. त्यासाठीच हे नवीन सदर सुरू होत आहे. भारतातील आगळ्यावेगळ्या प्रयोगशील शाळा.

शिक्षणासंदर्भाने अनेकविध प्रश्नांची चर्चा होत असते. शिक्षण कशाला म्हणावं? शाळा म्हणजे काय? ती कशाला हवी? शिक्षणसंस्था म्हणजे काय? अलीकडे शाळा म्हणजे पंचतारांकित हॉटेल आणि शिक्षण म्हणजे फाडफाड इंग्लिश बोलणं असा एक (गैर)समज रूढ झाला आहे. प्रत्येक शाळा आम्ही मूल्यशिक्षण' देतो, असा दावा करते. तरीही अनेक शाळांमध्ये हिंसा अनुभवायला मिळते. म्हणूनच मूल्य शिक्षणाचा पुनर्विचार करावा लागतो. या पुनर्विचारातही पुन्हा चर्चा येतेच.

बदल आणि परिवर्तन हे शब्द समोर ठेवून फार मोठं तत्त्वज्ञान भाषणांमधून मांडलं जातं, लेखांमधून लिहिलं जातं. त्यावर वाद घातले जातात; मतमतांतरं असतात, मात्र या सगळ्यातून आवश्यक त्या गोष्टींची अंमलबजावणी बरेचदा राहूनच जाते. एकीकडे ब्रिटिशांनी दाखवून दिलेल्या शिक्षणाच्या मार्गाने म्हणजे मेकॉलेप्रणित शिक्षण पद्धतीला अनुसरून डोळे मिटून आपण दीडशे वर्षांहून अधिक काळ शैक्षणिक वाटचाल केली आहे. अनेक स्तुत्य बदलांची गरज जाणवूनसुद्धा ते कृतीत आणणं आपल्याला फारसं जमलेलं नाही, मात्र हे सर्वसाधारण चित्र झालं. दरम्यान, अनेक प्रतिभावंतांनी आणि विचारवंतांनी स्वत:च्या कल्पकतेतून काही नवीन संकल्पना राबवण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला या क्षेत्रात अनुभवायला मिळतो.



कोठारी आयोगाचं प्रसिद्ध वाक्य आहे- भारताचं भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडतं.' पण प्रश्न हा आहे की वर्गखोल्या किती प्रयोगशील आहेत. जगभरात अशा कितीतरी शाळा आहेत की ज्यांनी आपल्या वर्गखोल्या प्रयोगशील करून खऱ्या अर्थाने शिक्षणात क्रांती घडवून आणली आहे. कोणत्याही छोट्या-मोठ्या चर्चेच्या पलीकडे जात काही विचारवंत खरोखरंच परिवर्तनाच्या दृष्टींने पावलं उचलतात आणि इतिहास घडू लागतो. ते फक्त बोलले नाहीत तर त्यांनी कृतीतून शिक्षणाचा नवीन मार्ग दाखवला आणि तो काही फक्त त्यांच्यापुरता मर्यादित नाही. प्रत्येक शाळा त्यांच्या कृतीची अंमलबजावणी करू शकते. खडतर आणि अनोख्या वाटांवरून जात या माणसांची कल्पकता दशदिशांनी झेपावलेली दिसते. त्यांनी सुरू केलेल्या जीवनमूल्यं उंचावणाऱ्या शाळा खऱ्या अर्थाने जगणं शिकवतात. या शाळांची कार्यप्रणाली पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांनी समजून घेतली आणि त्या दिशेने पावलं टाकली तर प्रत्येक मूल अद्वितीय घडू शकतं. बऱ्याच शाळांनी सिस्टीममध्ये राहून स्वत:मध्ये असे काही बदल घडवून आणले की ज्याच्यातून गुणवत्ता सुधारली. हे बदल नक्की काय आहेत? हे बद्दल सार्वत्रिक होऊ शकतात, फक्त त्याची माहिती तुमच्यापर्यंत पोहचली पाहिजे.

आपल्याला मुलांच्या प्रतिभेवर भर देईल अशा शिक्षण पद्धतीची गरज आहे, जे शिक्षण स्मरणशक्तीला केंद्रस्थानापासून काढून विद्यार्थ्यांना सेल्फ लर्नर बनवेल. भविष्यात देशाला अतिशय उच्च प्रतीचं मनुष्यबळ लागणार आहे. एआयच्या म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तोडीस तोड माणसाच्या भावनिक बुद्धिमत्तेचा कस लागणार आहे. इथे दोन्हींचा मिलाफ साधणारं तारतम्य महत्त्वाचं ठरणार आहे. चार भिंतींत चालणारं आणि शाळेतल्या पुस्तकांच्या कुबड्यांवर उभं राहणारं बंदिस्त शिक्षण म्हणजे जीवन शिक्षण नाही. बोन्साय मुलं निर्माण करणाऱ्या आपल्या शिक्षणसंस्था होऊ नयेत यासाठी आपल्याला चांगल्या शिक्षण संस्थांचा अभ्यास करणं गरजेचं आहे.

**- सचिन जोशी.**

जन्म हा अखेरचा

# परमात्मस्थल



रसना, घ्राण आणि त्वचा ही इंद्रिये विषयापर्यंत जात नाहीत. विषयानेच त्यांच्याजवळ यायला पाहिजे. या इंद्रियाजवळ विषय आले की वृत्ती विषयाकार होऊन त्यांचे ज्ञान प्राप्त होते. अशाप्रकारे ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय या त्रिपुटीच्याद्वारे जीवात्म्याला बाह्यज्ञान होत असते. परंतु आत्मज्ञानासाठी मनोवृत्तीला बाहेर धाव घेण्याची आवश्यकता नाही. मी घट जाणतो, यामध्ये 'मी' हा ज्ञाता, 'घट' हे ज्ञेय आणि 'जाणणे' हे ज्ञान होय. परंतु जेव्हा आत्म्याच्या संदर्भात 'मी आत्मा जाणतो' असे म्हटले जाते तेव्हा ज्ञाता 'आत्मा' असतो. येथे ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय हे तिन्ही एकरुप होतात. म्हणून तेथे भेद राहत नाही. घटज्ञान आणि आत्मज्ञान यांच्यामध्ये एवढे अंतर आहे. या ठिकाणी वृत्ती आत्माकार झालेली असते. आत्मज्ञानात आत्म्याशिवाय अन्य वस्तूचे ज्ञान आणि त्रिपुटीचा व्यवहार नसतो.

**अकर्ताऽहमवेत्ताऽहमदेहोऽहं निरंजन: ।**
**इति चिन्तयत: साक्षात् संविदेव प्रकाशते ।।**
१८.५३।।

त्रिपुटीरहित महाबोधाची प्राप्त झालेल्या ज्ञानी पुरुषाच्या स्थितीचे वर्णन केले आहे. ज्ञानी पुरुष कृतकृत्य झालेला असतो. त्याच्यासाठी करण्याजोगे काही उरलेले नसते. म्हणून तो अकर्ता असतो. त्याच्यासाठी जाणण्यायोग्य काहीही नसते. कारण त्याने सर्वकाही जाणलेले असते. म्हणून तो अवेत्ता असतो. अर्थात् तो काही जाणत नाही. स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तिन्ही देहांचा अभिमान त्याच्या ठिकाणी नसल्यामुळे तो अदेही म्हणजे देहरहित असतो. जीवात्मा केवळ देहात निवास करतो. या कारणासाठी तो 'देही' नसतो. तो देहाभिमान बाळगतो म्हणून 'देही' असतो. घरात अनेकजण राहत असतात. स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध, नोकर-चाकर, घराचा उपभोग सर्वच जण घेत असतात. कारण जो मालक असतो, त्याच्या ठिकाणी हे घर माझे आहे असा अभिमान असतो. केवळ घरात राहिल्यामुळे कोणी घराचा मालक ठरत नाही. त्याप्रमाणे केवळ देहात राहिल्याने जीवात्मा 'देही' ठरत नाही. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# ऑनलाइन शॉपिंगमध्ये भारताचा दबदबा

निश्चितपणे संपूर्ण जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी ऑनलाइन खरेदी आणि ई-कॉमर्समधील वाढीमुळे भारत आघाडीवर आहे.

दोन-अडीच दशकांपूर्वी भारतात ऑनलाइन शॉपिंग ही उच्चवर्गापुरती मर्यादित होती, पण आज त्याचा फायदा सर्वसामान्यांनाही होत आहे. ऑनलाइन उत्पादनांची कॅटलॉग तपासण्याची आणि एका क्लिकवर इच्छित वस्तू परत करण्याच्या सुविधेसह घरोघरी वितरणाचा चमकदार फायदेशीर बाजार ही ई-कॉमर्सचे देणगी आहे. आता नवीन वर्ष २०२४ मध्ये, केंद्र सरकार भारतातील ई-कॉमर्स बाजारातील कोट्यवधी ग्राहकांचे मोठे ग्राहक हित लक्षात घेऊन ई-कॉमर्समध्ये वाढ करताना दिसेल. भारतातील ई-कॉमर्स बाजाराची उलाढाल २०१० मध्ये एक अब्ज डॉलर्सपेक्षा कमी होती. ती २०१९ मध्ये सुमारे ३० अब्ज डॉलरच्या पातळीवर पोहोचली. कोविड-१९ नंतर भारतात ऑनलाइन शॉपिंगमध्ये अकल्पनीय वाढ झाली असून ऑनलाइन खरेदीचा बाजार दरवर्षी वेगाने वाढू लागला आहे. जगातील प्रसिद्ध ई-कॉमर्स रिसर्च कंपनी 'बेन एंड' ने जारी केलेल्या 'द हाऊ इंडिया शॉप्स ऑनलाइन २०२३' या अहवालानुसार, २०२३ मध्ये भारतातील ई-कॉमर्स बाजारपेठ ५७ ते ६० अब्ज डॉलर्सची होण्याची अपेक्षा आहे. वित्त मंत्रालयाच्या ऑक्टोबर २०२३ च्या अहवालानुसार, २०२६ पर्यंत ई-कॉमर्सच्या बाजारपेठेची व्याप्ती १६३ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढू शकते. तथापि हे देशाच्या एकूण बाजारपेठेच्या केवळ ५.६ टक्केच असून देशातील ९४-९५ टक्के बाजारपेठ ऑफलाइन आहे. अमेरिकेत २३-२४ टक्के आणि चीनमध्ये ३५ टक्क्यांहून अधिक ऑनलाइन व्यवसाय आहे. यामुळे देशात ई-कॉमर्स वाढण्याची दाट शक्यता आहे. ई-कॉमर्सने भारतातील व्यवसाय आणि उपभोगाचे स्वरूप बदलले आहे.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

# सोलापूरकरांनो समजून घ्या...

होटगी रोडवरील विमान सेवेस असणारा मोठा अडथळा दूर होताच, ही सेवा तातडीने सुरू व्हायला हवी असा आग्रह धरणारी मंडळी सध्या डोके वर काढत आहेत. अजून विमानसेवा का सुरू झाली नाही? म्हणून आक्रोश ऐकू येत आहे. हीच मंडळी मोठा अडथळा काढायचा नाही म्हणून सक्रिय होती. खरोखरच या विमानतळावरून विमानसेवा सुरू होणार आहे काय? असा सर्वसामान्य लोकांच्या मनात प्रश्न आहे. हा प्रश्न असायचे कारण म्हणजे राजकीय व्यवस्थेवर आणि त्यात गुंतलेल्या लहान मोठ्या मंडळी वरील उडालेला त्यांचा विश्वास. ही मंडळी कांगावा करू शकतात, खोटे नाटे बोलू शकतात. पण प्रत्यक्षात काम करण्यासाठी ही मंडळी कधीच कार्यरत नसतात. याउलट असलेल्या प्रशासकीय कामकाजात आडवे घालण्याचे कामही मंडळी मोठ्या हिमतीने करीत असतात. अगदी थेट केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांना आपल्या सहीचे लेखी पत्र देऊन, याकडे दुर्लक्ष करा, म्हणून सांगणारी मंडळी आहेत. ही राजकारणातील ज्येष्ठ मंडळी आहेत. हे विसरून चालणार नाही. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे किंगफिशर कंपनीची विमान सेवा सुरू करताना उद्घाटन समारंभ यांच्याच हस्ते करण्यात आला होता. आपल्या प्रमुख भाषणात ही विमानसेवा चालणार नाही असा सोलापूरकरांना आशीर्वाद यांनीच दिला होता. जर आपणास ही खात्री होती तर आपण उद्घाटनाला यावयास नको होते, याचे भानही यांना राहिलेले नव्हते. असो हा एक स्वतंत्र विषय आहे.

विमान सेवेतील मोठ्या अडथळा संदर्भात न्यायालयाचे उंबरे झिजवण्यात आले. ज्यांनी हा अडथळा निर्माण केला त्यांनीच हे उंबरे झिजवलेले होते. या संपूर्ण प्रक्रियेत एक फार मोठा धोरणात्मक निर्णय न्यायालयाने घेतलेला होता. तो म्हणजे विमान प्रवाशांच्या जीवन सुरक्षिततेचा. प्रवाशांच्या जीवन सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले होते. कारण विमानसेवा सुरू असताना म्हणजेच विमान उडत असताना आणि उतरत असताना जर कोणते अडथळे येत असतील, तर ते असता कामा नयेत. ते असतील तर ते सर्व अडथळे प्रवाशांच्या जीविताच्या हितार्थ काढलेच पाहिजेत. नाहीतर जगात चुकीचे संदेश जातील, अशी भीती न्यायालयाने व्यक्त केलेली होती. ती खरी आहे.

एका मोठा अडथळा व्यतिरिक्त १०५-११० अडथळे असण्याचा कांगावा केला गेला. ते होते यात शंका नाही. ते किती लहान आणि किती मोठे यावर मात्र कधीच




भाष्य केले गेले नाही. पण हे काढण्यात मोठी अडचण होती असेही नाही. हे सर्व अडथळे एकापाठोपाठ आता काढण्यात आलेले आहेत. उच्च दाबाची विद्युत वाहिनी असो, मोबाईलचे टॉवर असो, विद्युत खांब असोत नाहीतर मोठाले वृक्ष असोत. हे सर्व अडथळे आता दूर झालेले आहेत. विमानतळाची भरभक्कम संरक्षण भिंत उभी करण्याचे काम चालू आहे. येथील विमानसेवा सुरू होत असताना विमान सेवेच्या फेऱ्या वाढणार आहेत, याची नोंद घेत असलेली धावपट्टी अधिकाधिक सक्षम आणि सुदृढ करण्याचे काम चालू आहे. हे सर्व तांत्रिक काम आहे. त्याला स्वतःचा असा वेळ लागत असतो. तो दिला पाहिजे. महानगरपालिकेचे कंत्राटदार आपले रस्ते बांधतात. त्या पठडीतले हे काम नाही, एवढे जरी सोलापूरकरांनी समजून घेतले, तर यास थोडा विलंब लागला तरी तो आनंदाने ते स्वीकारतील याची आम्हाला खात्री आहे. आम्ही सांगू इच्छितो की होटगी रोडवरील विमान सेवेसाठीची धावपट्टी अद्ययावत करण्याचे काम चालू आहे. प्रवाशांच्या प्रतीक्षा खोलीचे नूतनीकरण चालू आहे. विमान सेवा सुरू होण्यासाठी जे जे होणे अपेक्षित आहे, ते ते सर्व चालू आहे. नियोजन पद्धतीने सुरू आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

साधारणतः ४० किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांना मुक्कामाची एसटी हा प्रकार माहीत असेल. एसटी मुक्कामाला असेल तर सकाळची पहिली फेरी लवकर सुरू होऊ शकते, हा त्यामागचा उद्देश. सोलापूरकरांच्या नशिबात मुक्कामाचे विमान असेल तर ते आपणास नको आहे का? सकाळी लवकर मुंबईला घेऊन जाणारे विमान हवे आहे. पण जर सोलापूर विमानतळावर सकाळी सकाळी हे विमान उपलब्ध नसेल तर हे कसे शक्य आहे? एक नव्हे तर चार मुक्कामाच्या विमानाची व्यवस्था सध्या चालू आहे. याचा मुख्य फायदा म्हणजे राम प्रहरी सोलापुरातून विमान उडण्याची सेवा हा आहे.

अजून विमानसेवा का सुरू झाली नाही म्हणून कांगावा करणारे १०५-११० अडथळ्यांची आता नेमके काय स्थिती आहे, याबाबत कधीच भाष्य करताना दिसून येत नाहीत. विमानतळावर चालू असलेल्या कामाबाबत चौकशी करणारे अनेक जण आहेत. नेमके काय चालू आहे हे समजून घ्यायची त्यांची धडपड आहे. त्यांना एवढेच सांगणे आहे की जे चालू आहे ते चालू द्या. त्या चौकशीत संशयाच्या भूमिकेतून पाहू नका. कारण माहिती घेणाऱ्या प्रत्येक जण त्यातील दोष काढत फिरतो आहे, हा काहीसा अनुभव नजरेस पडतो आहे. जी व्यवस्था कार्यरत आहे ती पूर्णपणे चारी बाजूने विचार करून कार्यरत आहे हे लक्षात येत आहे.सोलापूरकरांना होटगी रोडवरील विमानतळावरून सुरू होण्याच्या विमानसेवेबाबतचे काही वास्तव सांगावे या भूमिकेतून हा लेखन प्रपंच. धीर धरी रे धीरा पोटी, असती फळे रसाळ गोमटी या वर विश्वास ठेवा एवढेच सांगणे. (उत्तरार्ध)

**- श्रीनिवास वैद्य,**
चार्टर्ड अकौंटंट, सोलापूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त

### भेंड येथे पैशाच्या वादातून पेट्रोल ओतून पेटविले

#### महिलेसह तिघांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा

**सोलापूर** : उसने दिलेल्या पैशाच्या वादातून अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिल्याने ४० वर्षीय महिला भाजून गंभीर जखमी झाली. ही घटना भेंड (माढा) येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी कुर्डवाडीच्या पोलिसांनी दोन महिलासह तिघा विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. शोलेबाई समिंदर काळे (वय-४०, भेंड) असे भाजलेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना गंभीर अवस्थेत सोलापुरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कुर्डवाडीच्या पोलिसांनी त्यांची चुलत जाऊ मीना संजय काळे, दीपक पाटील आणि मंगल पवार (सर्व पडसाळी, माढा) या तिघाविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्हा दाखल केला. आरोपी दीपक पाटील याच्यासह तिघेजण गुरुवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारात भेंड येथे शोलेबाई यांच्याकडे आले होते. आणि पैशाच्या वादातून भांडण केले. त्यानंतर एकीने शोलेबाई यांना पकडले. तर दुसरीने सोबत आणलेल्या बाटलीतील पेट्रोल ओतून आग लावली. त्यानंतर दोघी दीपक पाटील याच्या दुचाकीवरून पसार झाले. अशी नोंद पोलिसात झाली. तपास फौजदार वाघमारे करीत आहेत.

### अक्कलकोट येथे रिक्षाचालकास मारहाणप्रकरणी १३ जणांवर गुन्हा

**सोलापूर** : अक्कलकोट येथील बेडर कन्हैया चौकात आकाश माने या रिक्षा चालकास रॉड आणि काठीने मारहाण करून खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यापैकी पोलीसांनी दोघांना अटक करून पोलीस कोठडी मिळवली आहे. आकाश राजेश माने (वय-२२, बेडर गल्ली अक्कलकोट) असे जखमी झालेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शंकर घाडगे, भीमा घाटगे, प्रतीक बनसोडे, गणेश बनसोडे, आदित्य मळीखांबे, अजय मळीखांबे, रुपेश मळीखांबे, गणेश मळीखांबे, दत्ता घाटगे, अभिजीत मळीखांबे, ज्ञानेश्वर दसाडे, सतीश सुतार आणि साईनाथ गायकवाड (अक्कलकोट) अशा १३ जणाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या सर्वांनी मिळून शनिवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास पूर्वीच्या भांडणावरून आकाश माने या रिक्षा चालकाला बेदम मारहाण करून खुनाचा प्रयत्न केला होता. अशी नोंद पोलिसात झाली. तपास फौजदार मोरे करीत आहेत.


# ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा

## सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात चार जोडपी विवाहबद्ध

सुराज्य/नातेपुते

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा ११० वा पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सोहळ्यात अखंड जप, सांप्रदायिक भारूड, नारदीय किर्तन, पूर्णाहूती यज्ञ आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. चार जोडप्यांचा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळाही पार पडला.

दि. ६ जानेवारी रोजी पहाटे ४. ३० ते ५.३० अभिषेक, पूजा, काकडारती, ५.५५ वाजता गुलाल, पुष्पवृष्टी करण्यात आली. सकाळी १०.३० ते दोन वाजेपर्यंत सर्व भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. सायंकाळी ६.०७ वाजता या गोरजमुहूर्तावर चार जोडप्यांचा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा पार पडला. वधूवरांना संसारोपयोगी साहित्य संच, ग्रंथभेट देण्यात आले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, महेश शेटे, बाळासाहेब काळे, रणवीर देशमुख, किरण टकले, राजा देशमुख, किशोर पलंगे, शक्ती पलंगे उपस्थित होते. यावेळी सोहळाप्रमुख मार्गदर्शक धैर्यशील देशमुख, सतीश बर्गे, सतीश बडवे, संपत पांढरे, दत्ता उराडे, लाळगे, संभाजी लांडगे, जितेंद्र मोरे, जालिंदर ठोंबरे, दिगंबर लाळगे, नवनाथ बर्गे, चंद्रकांत पांढरे, सद्गुरु श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर पुण्यतिथी सोहळा समिती नातेपुते यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संदीप जाधव यांनी केले.



नातेपुते : ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित विवाह सोहळ्यातील जोडप्यांना ग्रंथ देताना उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, सोहळा समितीचे प्रमुख धैर्यशील देशमुख आदी.

### सोहळ्यातील कार्यक्रम

गुरुवार, दि. २८ डिसेंबर २०२२ ते बुधवार दि. ३ जानेवारी २०२४ पर्यंत प.पू. गुरु शिव गुरु पारखी कसबा पेठ पुणे यांची श्री शिव महापुराण कथा घेण्यात आली. श्रीराम जय राम जय जय राम या तारक मंत्राचा अखंड जप महाराजांची झोळी नातेपुते शहरातील प्रत्येक गल्लीत भक्तांकडून फिरवण्यात आली गुरुवार, दि. ४ जानेवारी रोजी ह.भ.प. विलास बुवा गरवारे यांचे नारदीय किर्तन झाले. शुक्रवार, दि. ५ जानेवारी रोजी पूर्णाहुती यज्ञ सोहळा व रामनाम जप कार्यक्रम झाला. शनिवार, दि. ६ जानेवारी रोजी मोठ्या उत्सवात पुण्यतिथी समारंभ यामध्ये अभिषेक पूजा, काकडारती, सामुदायिक नामस्मरण, श्रीराम धून गुलाल, पुष्पवृष्टी श्री महाराजांचे दैनंदिन गुलालाचे प्रवचन, निरूपण महाप्रसाद, चार जोडप्यांचे सर्वधर्म सामुदायिक विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

## पोलीस मुख्यालयात वडिलांना भेटण्यास आलेल्या तरुणाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

आपल्या वडिलांना गावाकडे घेऊन जाण्यासाठी आलेल्या तरुण मुलाचा मृत्यू झाल्याची घटना पोलीस मुख्यालय (शहर) येथील वसाहतीत रविवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

बाळासाहेब भाईदास सुर्यवंशी (वय-२५, बोधगाव, साखरी, धुळे) असे मयत झालेल्या विवाहित तरुणाचे नाव आहे. तो धुळे येथे राहण्यात असून दोन दिवसांपूर्वी वडिलांना गावाकडे घेऊन जाण्यासाठी सोलापुरात आला होता. पोलीस वसाहत येतील १४ नंबरच्या पोलीस तो बेशुध्द आढळला. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. याची नोंद जेलरोड पोलिसात झाली. या मागचे कारण समजले नाही. हवालदार घुगे मेजर तपास करीत आहेत .


## सतारवादनाने घातली रसिकांच्या मनावर मोहिनी

### रसिका कुलकर्णी,सानिका कुलकर्णी या विद्यार्थिनींचे शास्त्रीय गायन

सुराज्य/सोलापूर

आंतरराष्ट्रीय किर्तीचे सतारवादक हजरा सप्तर्षी यांनी सतारवर वाजविलेल्या बागेश्री रागाने रसिक श्रोत्यांवर मोहिनी घातली. सारेच सतारच्या तारांमधून निघणा-या स्वरांमध्ये तल्लीन झाले होते. तर रसिका व सानिका कुलकर्णी यांनी केलेले गायन आणि देवश्री अग्नीहोत्री या विद्यार्थिनीने सादर केलेल्या भरत नाट्यमने श्री. व्यंकटेश संगीत विद्यालयाच्या ३० व्या दोन दिवसीय संगीत महोत्सवाची सांगता झाली.

दरम्यान, संगिताच्या विश्वात वजन असलेले महाराष्ट्रातील ख्यातनाम शास्त्रीय गायक पंडीत मोहनकुमार दरेकर (पुणे) यांनी ६० व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल संगीत विद्यालयाच्या वतीने सदाशिवराव देशपांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गुरुवर्य बाळासाहेब कुलकर्णी, सुरुची जोशी, संतोष कुलकर्णी आदी उपस्थित होते.



#### बाळासाहेब कुलकर्णी यांचे मोठे योगदान

सात दशकांपूर्वी गुरुवर्य दिगंबरबुवा कुलकर्णी यांनी सोलापुरातील टोळाच्या बोळात सुरु केलेल्या श्री व्यंकटेश संगीत विद्यालयाची धुरा त्यांचे सुपूत्र बाळासाहेब कुलकर्णी हे मोठ्या नेटाने चालवित आहेत. वडिलांच्या अन् दिवंगत बंधू गुरुवर्य दत्तात्रय कुलकर्णी यांच्या स्मृती जपण्यासाठी दरवर्षी बाळासाहेब कुलकर्णी हे दोन दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन करतात. सोलापूर शहरातील रसिक श्रोत्यांना अंतरराष्ट्रीय गायक, वादकांच्या कलेची मेजवाणी मोफत देऊन एक प्रकारे संगीत ज्ञान यज्ञच करीत असतात. मोबाईलच्या जमान्यात नैतिकमुल्यांची विद्यार्थ्यांनी जपणूक करावी,यासाठी ते विद्यार्थ्यांना गायन, वादनाबरोबरच शिस्तीचे धडेही देतात.

## शरणम्मा पावटे यांचे निधन



**सोलापूर** : येथील शरणम्मा गुरुपादप्पा पावटे यांचे सोमवार, दि. ८ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, दि. ९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता विजयालक्ष्मीनगर, वेलकम हॉलजवळ, अक्कलकोट रोड, सोलापूर येथील त्यांच्या राहत्या घरातून निघून रुद्र भूमी, रुपाभवानी रोड, सोलापूर येथून निघणार आहे.

## मोकाट जनावरांच्या बंदोबस्ताची मागणी

**सोलापूर** : सोलापूर शहरातील बाळीवेस, कन्ना चौक, सम्राट चौक, टिळक चौक, अशोक चौक आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावरे रस्त्यावर उभी राहतात त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. तरी बंदोबस्त करण्याची मागणी वाहनधारकांमधून होत आहे.

# रिपब्लिकन सेनेच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी सागर गायकवाड यांची फेरनिवड



पंढरपूरः रिपब्लिकन सेनेच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी सागर गायकवाड यांच्या निवडीनंतर त्यांना नियुक्तीपत्र देताना आनंदराज आंबेडकर, संजीव बावधनकर, काकासाहेब खंबाळकर आदी दिसत आहेत.

सुराज्य/पंढरपूर

रिपब्लिकन सेना महाराष्ट्र प्रदेशाची बैठक रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, राष्ट्रीय महासचिव संजीव बावधनकर, रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र अध्यक्ष काकासाहेब खंबाळकर यांच्या उपस्थितीत नुकतीच मुंबई येथे बैठक झाली. बैठकीत रिपब्लिकन सेनेच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी सागर गायकवाड यांची फेरनिवड झाली आहे.

'ईव्हीएम हटाव देश बचाव'चा नारा बुलंद करण्यासाठी महाराष्ट्रभर आंदोलनाचा इशारा आनंदराज आंबेडकर यांनी दिला. आगामी निवडणुकीसाठी रिपब्लिकन सेनाच्या पदाधिकाऱ्यांनी कामाला लागण्याचे आवाहन केले. युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांनी राज्यात नूतन कार्यकारणी निवडताना युवकांना संधी देणार असून त्यासाठी राज्यभर दौरा करणार असल्याचे सांगितले. यावेळी सागर गायकवाड यांची निवडीनंतर मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सागर गायकवाड यांनी दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले. निवडीबद्दल सोलापूर जिल्हा तसेच पश्चिम महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.


महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

महावितरण बार्शी संवसु विभागा अंतर्गत चालू आार्थिक वर्षाकरिता वितरण रोहित्रांची व एचव्हीडीएस रोहित्रांची, रोहित्र व तेल, उच्च / लघुदाबवाहिनीचे साहित्य, सिमेंट पोल इत्यादी रोहित्र दुरुस्ती एजन्सी ते फिल्टर युनिट बार्शी / उपविभाग किंवा बार्शी विभागांतर्गत राज्यात कोठेही वाहतूक करणे. चढ/उतार करणे आदि कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागिविण्यात येत आहेत. निविदा क्रमांक ईई /बीआरएस/टी-१७/२३-२४ (निविदेची रक्कम ५ लाख) आणि निविदा भरण्याची सुरुवात दि. ०६.०१.२०२४ सकाळी १०:०० व अंतिम तारीख १४.०१.२०२४, १४:०० वाजेपर्यंत आहे. निविदा तपशील व डाऊनलोड करण्यासाठी कृपया महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatapp. संकेतस्थळाला भेट द्या. कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे / नाकारणे व रद्द करणे यासाठी सर्व हक्क अधोरेखित आहेत. कृपया नोंद घ्या.

PRO/BMTZ/ 178 /2023-24

कार्यकारी अभियंता,
महावितरण बार्शी विभाग



**जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) सोलापूर**

दूरध्वनी क्रमांक -0217-2720545 | Email ID - dycollectorslao007@gmail.com

क्र.2023/उभूसक्र.7/मोहोळ/संकीर्ण.1/कावि-1388 | दिनांक-02/01/2024

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूर जिल्हयातील व उत्तर सोलापूर तालुक्यातील तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **कार्यकारी अभियंता,उजनी कालवा विभाग क्र.8 सोलापूर** यांचेकडील मौजे देगाव, तालुका-उत्तर सोलापूर,जि. सोलापूर येथील **प्रयोजन-भीमा (उजनी) देगांव शाखा कालवा कि.मी. 4 मधील सा.क्र.3/930 येथील गावरस्ता पुलाच्या पोहोच रस्त्याच्या बाजूने पर्यायी रस्त्यासाठी खाजगी जमीन** या कामासाठी भूसंपादन करणेसाठी सोबत जोडलेल्या अनुसुचीमध्ये नमूद एकूण क्षेत्र 0 हे 25 आर जमिन महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. संकीर्ण -03/2015 प्र.क्र.34/अ-2 दि. 12/05/2017 व संकीर्ण- 03/2015 प्र.क्र.34/अ-2 दि. 30/09/2015 प्रमाणे व परिपत्रक क्र.एलक्युएन-1/2017 प्र.क्र.12/अ-2 दि.25/1/2017 मध्ये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित आहे.

सदरबाबत जमिनीतील हक्क, कुळ, टाच, हितसंबंध व वारस इत्यादीबाबत हरकत/तक्रार असल्यास वा जमिनीच्या खरेदीदराच्या अनुषंगाने म्हणणे मांडावयाचे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून 15 दिवसांच्या आत समक्ष अथवा रजिस्टर्ड पोष्टाने कार्यालयीन वेळेत (सकाळी 10 ते सायं 5.45 वाजेपर्यंत) पोहोचेल अशा रितीने उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) सोलापूर यांचे कार्यालयाकडे लेखी म्हणणे / हरकत सादर करावी. अन्यथा खालील अनुसुचीत स्तंभ 3 मध्ये नमूद जमीन स्तंभ 2 मध्ये नमूद जमीन मालकाची निर्वेध व निजोखमी मिळकत असल्याचे समजण्यात येईल. दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही.

सोबत:- अनुसूची
दिनांक :-02/01/2024
स्थळ :- सोलापूर

सही/-
(श्रावण क्षीरसागर)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
क्र.7 (मोहोळ) सोलापूर

**अनुसूची**

संपादन संस्थेचे नाव :- कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.8 सोलापूर
भूसंपादनाचे प्रयोजन :- भीमा (उजनी) देगांव शाखा कालवा कि.मी. 4 मधील सा.क्र.3/930 येथील गावरस्ता पुलाच्या पोहोच रस्त्याच्या बाजूने पर्यायी रस्त्यासाठी खाजगी जमीन

| अ.क्र | भूधारकाचे नाव | गट नंबर | भूधारणा पध्दती | गाव नमुना नं. 7/12 प्रमाणे क्षेत्र (हे.आर.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | चांगदेव थावरु राठोड,महेश पुंडलिक राठोड,महेशचे अपाक वासुदेव थावरु राठोड,वासुदेव थावरु राठोड,विठ्ठल थावरु राठोड,सुनिल थावरु राठोड,सोपान थावरु राठोड,सोनाबाई थावरु राठोड व इतर अधिकार अभिलेखाप्रमाणे | 125/4 | भोगवटादार वर्ग -1 | 2.29 | 0.05 |
| 2 | विजय अनिल वानकर,मनिषा अनिल वानकर,तोताबाई शिवाजी राठोड,महादेव शिवाजी राठोड,लक्ष्मण शिवाजी राठोड,बाळू शिवाजी राठोड,मोहन शिवाजी राठोड व इतर अधिकार अभिलेखाप्रमाणे | 125/1/ब | भोगवटादार वर्ग -1 | 1.14 | 0.20 |
| | एकूण क्षेत्र हे. आर. | | | | 0.25 |

दिनांक : ०२/०१/२०२४
स्थळ : सोलापूर

शिक्का

सही/-
(श्रावण क्षीरसागर)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
क्र. ७ (मोहोळ) सोलापूर

जिमाका/सो/जाहि/३०२/२०२३-२४




उत्तर सोलापूरः रेशनकार्डसंबंधित मागण्यांसाठी उत्तर तहसील कार्यालयासमोर आंदोलनप्रसंगी छावा संघटनेचे कार्यकर्ते.

## छावाचे शिधापत्रिकाधारकांच्या मागण्यांसाठी आंदोलन

सुराज्य/उत्तर सोलापूर

अखिल भारतीय छावा मराठा युवक संघटनेच्यावतीने शिधापत्रिकाधारकांच्या विविध मागण्यांसाठी उत्तर सोलापूर तहसिल कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात आले. मागण्यांचे निवेदन जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांनी उत्तर सोलापूर नायब तहसीलदार कवडे व फुले यांना दिले.

निवेदनात ऑनलाईन, दुबार व नवीन रेशनकार्ड करून द्यावे, धान्यासोबत पावती मिळावी, दक्षता समिती स्थापन करावी आदी मागण्यांचा निपटारा गावपातळीवर करून द्यावा, अन्यथा पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी तालुकाध्यक्ष अविनाश गरड, जिल्हाध्यक्ष अमोल पाटील, दशरथ पवार, अण्णा साठे, विष्णू सावंत, सोसायटीचे अध्यक्ष भरत साठे, अण्णा साठे, नागनाथ पाटील यांच्यासह महिला लाभार्थी उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकामविभाग क्र.२,सोलापूर**
**सातरस्ता,कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
e-mail-solapur2.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी / फॅक्स क्र.(०२१७) २३१२३०२
**ई- निविदा सुचना क्रमांक ४४ सन २०२३-२४(ऑनलाईन)**

**कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,सोलापूर** योग्य त्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.२, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.तसेच सदर निविदासूचने मध्ये काही बदल झाल्यास खालील नमूद केलेल्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करण्यात येईल.
**टिप**वरील ई-निविदा सुचनामध्ये एकूण **०१** कामांचा समाविष्ट असून वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर **दि.०९/०१/२०२४** पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग (पुणे-सोलापूर) ते एन.टी.पी.सी. पम्प हाऊस पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. किमी ०/०० ते ४/२०० ता. माढा, जि. सोलापूर | Construction of BT & Concrete Road from NH(Pune-Solapur) to NTPC house at Ujani (Tembhurni) km 0/00 to 4/200, Tal. Madha, Dist. Solapur | ४६८.०० लक्ष |

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिकबांधकामविभाग क्र.२,सोलापूर कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजननिक बांधकाम विभाग क्र.२ , सोलापूर

जा.क्र. साबांवि-२/लेखा/निविदा/ /सन २०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकामविभाग क.२, सोलापूर
दिनांक / /२०२४

(DGIPR-ROC-2023-24-5-C6435)

## संक्षिप्त वृत्त



### चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत फुड फेस्टिवल

**सोलापूर** : चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा येथे वार्षिक फुड फेस्टिवल शनिवार दि. ६ जानेवारी रोजी पार पडला. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना देशातील खान पानची माहिती व्हावी,या दृष्टिकोनातून हे आयोजन केले होते. फेस्टिवलचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. जे. बी. बागबान यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून हाजी बशीर अहमद बागबान, मुख्याध्यापिका सौदागर गजाला परविन उपस्थित होते. यावेळी विधार्थ्यांनी विविध पदार्थ तयार करून आणले होते. कार्यक्रमाचे नियोजन बागबान नाहिद यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खतिब उम्मे हबीबा यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### आ.प्रणिती शिंदे यांचा सत्कार, दिनदर्शिकेचे प्रकाशन

**सोलापूर** : आमच्या संस्थेस प्रणिती शिंदे यांनी आमदार फंडातून क्रीडा, व्यायाम साहित्य व इतर साहित्य दिल्याने त्यांचा कृतज्ञ सोहळा सत्कार व एनटीआर यांचे जन्म शताब्दी व संस्थेचे ५० वर्ष गोल्डन ज्युबली एनटीआर यांचे ज्येष्ठ चाहत्यांचे सत्कार व एनटीआर संस्थेचे २०२४ चे कॅलेंडर प्रकाशन सोहळा आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते व कॉ. आ.नरसय्या आडम (मास्तर) यांच्या अध्यक्षतेखाली नागनाथ पोरंडला, रामचंद्र जन्नू वि.प. नेता, पांडुरंग दिड्डी, वि.प.नेता, विनायक कोंड्याल, देविदास गुंडेटी, हणमंतु सायबोळू, बालराज बोल्ल, मल्लिकार्जुन कमटम, रेणूका बुधाराम यांच्या उपस्थितीत बुधवार, दि.१० जानेवारी २०२४ रोजी ठिक सकाळी १० वाजता स्थळ - सुनिल नगर, तेलुगू शाळा क्र.१ सोलापूर, चनबसवेश्वर नगर येथे होणार आहे.

### करांडेवस्ती येथील चिमुकल्यांना वह्या वाटप करुन वाढदिवस साजरा

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील करांडेवस्ती जि.प. प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या राजलक्ष्मी प्रमोद भैस हिने वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून आपल्याच शाळेतील मित्र- मैत्रिणींना वह्यांचे वाटप केले.

# जनहित संघटनेचे आंदोलन आठव्यादिवशीही सुरूच

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती कारभाराच्या चौकशीची मागणी

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या कारभाराची चौकशी करण्याच्या मागणीसाठी जनहित शेतकरी संघटनेचे आंदोलन आठव्या दिवशीही सुरु आहे. दररोज विविध सामाजिक संघटनांचा आंदोलनाला पाठिंबा वाढत चालला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख व वकील दत्तात्रय खडतरे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १ जानेवारीला धरणे आंदोलनाला सुरुवात झाली. गेल्या ८ दिवसापासून सुरेश नवले, ज्ञानेश्वर भोसले, गणेश चव्हाण, सुखदेव डोरले, माऊली खरात, बापु खरात, दामाजी मोरे हे बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत. आंदोलनास वंचित आघाडीचे राजा शिंदे, बसपाचे भालचंद्र कांबळे, वाल्मिकी समाजाचे सोमनाथ करकमकर, गणेश अंकुशराव, दादा करकमकर यांनी पाठिंबा दिल्याचे संघटनेच्यावतीने सांगण्यात आले.

मुदत संपलेली मंदिर समिती बरखास्त करा, लाडूचा भ्रष्टाचार, ओरिजनल व बनावट सोन्याची तातडीने चौकशी करावी, विठ्ठल मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड हे अनेक वर्षापासून भ्रष्ट कारभार करीत आहेत, त्यांच्या कारभाराची व मालमत्तेची चौकशी करुन त्वरित निलंबित करावे,गोशाळा व भक्तनिवासमधील भ्रष्टाचार आदी मागण्या प्रभाकर देशमुख यांनी शासनाकडे केल्या आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनाही निवेदन दिले आहे. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे उपस्थित होते.

**मंत्र्यांच्या अनास्थेवर संताप व्यक्त**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकार सर्वसामान्यांचे असल्याचे म्हणतात. मात्र पंढरपूर दौऱ्यावर आल्यानंतर कॅबिनेटमंत्री संदिपान भुमरे मंदिरातुन दर्शनानंतर माघारी जाताना त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला असता तसेच निघून गेले हे चुकीचे आहे. मंत्र्यांना वेळ नसेल तर त्यांनी राजीनामे द्यावेत, असा संतापही देशमुख यांनी व्यक्त केला.

**पुण्यातही पालकमंत्र्यांच्या घरासमोर रात्रभर धरणे**

पंढरपूरः गेले गेल्या आठ दिवसापासून पंढरपूर येथील शिवाजी महाराज पुतळ्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू असताना प्रशासन याची दखल घेत नाही. त्यामुळे भैया देशमुख यांनी पुणे येथील पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निवासस्थानासमोर रात्रभर धरणे आंदोलन केले.



मंदिर समितीविरोधात धरणे आंदोलनास बसलेले जनहित शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते.

# महूदचे तिघेजण अयोध्येकडे रवाना

सुराज्य/सांगोला

येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येत रामलल्ला मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना आणि राममंदिर लोकार्पण सोहळा होत आहे. या कार्यक्रमाबाबत हिंदू धर्मीयांमध्ये मोठी उत्सुकता व आस्था च आहे.या सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी महूद (सांगोला) येथील तीन युवक हजारो किलोमीटरचा सायकल प्रवास करत अयोध्येला निघाले आहेत.

महूद अंतर्गत असलेल्या खांडेकरवाडी येथील महेंद्र वसंत खांडेकर, सुरेश दादासाहेब खांडेकर व केतन किशोर शिंदे हे तीन युवक अयोध्येला सायकलवरून जाण्यासाठी १ जानेवारी रोजी निघाले आहेत.आमदार शहाजी पाटील,विधान परिषदेचे माजी सदस्य दीपक साळुंखे- पाटील यांच्यासह महूद ग्रामस्थांनी त्यांना या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. हे तिघेही शेतकरी कुटुंबातील असून शेतीवरच त्यांच्या कुटुंबाची उपजीविका होत आहे. एकूण दीड हजार किलोमीटर पैकी ३२० किलोमीटर प्रवास पूर्ण केला आहे. परभणी जिल्ह्यात असून लवकरच त्यांचा प्रवेश मध्यप्रदेश राज्यामध्ये होणार आहे. मध्यप्रदेशातून ते उत्तर प्रदेशातील अयोध्येमध्ये पोहोचणार आहेत.




सांगोला : महूद (सांगोला) येथील तीन युवक आयोध्याकडे निघालेल्या युवकांचे स्थानिकांकडून स्वागत केले जाणारे स्वागत.

सुमारे पाचशे वर्षापासून रखडलेले राम मंदिराचे काम पूर्ण होत आहे. हिंदू धर्मियांसाठी हा परमोच्च सोहळा आहे. २२ जानेवारीला होणाऱ्या सोहळ्यासाठी आम्ही २१ जानेवारी रोजी अयोध्येत पोहोचणार आहोत.२२ जानेवारी हा दिवस इतिहासात नोंद होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होवून दर्शन घेण्यासाठी आम्ही अयोध्येला जात आहोत.

**-महेंद्र खांडेकर,महूद**

# सरपंच परिषदेच्या दिनदर्शिकेचे आ. कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रकाशन

सुराज्य/अक्कलकोट



सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र यांच्या सोलापूर जिल्ह्याच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा आमदार सचिन कल्याणशेट्टी, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या हस्ते करण्यात आले.

सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रच्या सोलापूर जिल्हा पदाधिकारी यांच्यावतीने सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रचे प्रदेश उपाध्यक्ष विकास जाधव, जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, जिल्हा समन्वयक वनितातार्ड सुरवसे, अमोल दुरंदे यांच्या संकल्पनेतून सरपंच दिनदर्शिका तयार केली आहे. सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, प्रदेश उपाध्यक्ष विकास जाधव यांनी सरपंच परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शाश्वत विकास कामांसाठी येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी अतोनात प्रयत्न करत आहेत. जिल्हा समन्वयक वनितातार्ड यांनी दरवर्षी अक्कलकोट तालुक्यात दोन हजार दिनदर्शिका वाटप करत असतात.

या प्रकाशन सोहळ्यास आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी ,गोगावच्या सरपंच तथा सरपंच परिषदेच्या सोलापूर जिल्ह्याच्या समन्वयक सौ.वनिता सुरवसे, आरपी आय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, दैनिक अक्कलकोट समर्थ संपादक प्रवीण देशमुख, अशोक मुलगे, सुधाकर सुरवसे,पोलिस हवालदार विपीन सुरवसे, राहुल काळे, पोलीस पाटील,संतोष बनसोडे उपस्थीत होते.

# शेकापचे १२ उमेदवार बिनविरोध विजयी

सुराज्य/सांगोला

सांगोला येथील शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूतगिरणीच्या पंचवार्षिक निवडणुकीत आज सोमवार दि.८ जानेवारी रोजी झालेल्या मतमोजणीत शेतकरी कामगार पक्षाचे १९ उमेदवार निवडून आले आहेत.

या निवडणुकीत अगोदरच शेकापच्या दोन महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्या आहेत त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाने २१ पैकी २१ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे.निवडून आलेले विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे.. कापूस उत्पादक शेतकरी महिला संघातून बाबर वंदना तानाजी ८०१ पाटील शुभांगी सयाजीराव ८०१, हजारे शालन महादेव ७९३, रसाळ शोभा सुरेश ७९३, वाघमोडे उज्वला संजय ७९३, बंडगर विमल सुबराव ७८९, खतीब शबाब मज्जिद ७८९, पाटील मालन विष्णू ७८९, मदने सुरेखा संजय ७८५, कोळेकर छाया सोपान ७७५, यमगर मायाक्का मायाप्पा ७७५,बिगर कापूस उत्पादक शेतकरी महिला मतदार संघ.. ढोबळे प्रतिभा शिवाजीराव २६८, जोशी नम्रता नागेश २६७, भगत द्रोपती सोपान २६३, मिसाळ गोकुळाबाई ज्ञानेश्वर २६१, रुपनर आनंदीबाई रंगनाथ २६०, सहकारी संस्था मतदारसंघातून उषा रवींद्र देशमुख तर कल्पना प्रकाश शिंगाडे या भटक्या जाती जमाती विशेष मागास प्रवर्ग महिला मतदारसंघातून बिनविरोध निवडून आले आहे. अनुसूचित जाती जमाती महिला राखीव मतदार संघातून बनसोडे रतन संभाजी ११४१ तर बनसोडे स्मिता किशोर ११५६ मताने निवडून आले आहेत तसेच इतर मागासवर्गीय महिला प्रतिनिधी मतदारसंघातून राजश्री रामचंद्र जाधव या निवडून आल्या आहेत.शेतकरी महिला सूतगिरणीच्या निवडणुकी च्या २१ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी संस्था मतदारसंघातून व भटक्या विमुक्त मतदारसंघातून प्रत्येकी एक अर्ज आल्याने शेकापचे दोन उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित १९ जागांसाठी रविवार दि.७ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती आज सोमवार दि.८ जानेवारी रोजी मतमोजणी होऊन शेतकरी कामगार पक्षाच्या सर्व १९ उमेदवार बहुमताने निवडून आले असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी चंद्रकांत टीकुळे यांनी जाहीर केले.

# 'दक्षिण'मधील जनतेचा विश्वास सार्थ ठरविला : देशमुख

## वांगी येथे २३ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्याने राज्याला मुख्यमंत्री निवडून दिला अनेक वर्षे आमदार ठराविक पक्षाचेच होते तरीही तालुक्याचा त्यांना विकास साधला नाही. तालुका मागासलेला ठेवण्याचे काम तत्कालीन सत्ताधारीने केले आहे.मात्र गेल्या नऊ वर्षात आपण दक्षिण सोलापूर मतदारसंघांमध्ये कोट्यावधीची विकास कामे करून तालुक्याचे चित्र बदलण्याचे काम केले आहे.जनतेने ज्या विश्वासाने आपल्याला निवडून दिले त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न आपण प्रामाणिकपणे केल्याची भावना आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली.

वांगी येथे मंद्रूप-वांगी रस्ता, वांगी-गावडेवाडी रस्ता, वांगी-हनुमाननगर रस्ता, वांगी-वडकबाळ रस्ता, वडकबाळ ते वडकबाळ तांडा रस्ता अशा २३ कोटी ४० लाख रुपयांची विविध रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन व काही कामांचे लोकार्पण आमदार देशमुख यांच्या हस्ते केले. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी वांगीच्या सरपंच खडाखडे,माजी सरपंच श्यामराव हांडे, सूरज खडाखडे,उपसरपंच ताराबाई ठेंगे, सदस्या वैशाली मलाव, कल्याणी केंगार, रशीदबी शेख, सुज्ञानी सोनवणे, ओमप्रकाश जवळकोटे, लक्ष्मण खडाखडे,वडकबाळचे राहुल पुजारी,मळसिध्द मुगळे, सरपंच भीमाशंकर बबलेश्वर,यतीन शहा, संगप्पा केरके, जगन्नाथ गायकवाड,गौरीशंकर मेंडगुदले,विश्वनाथ हिरेमठ, भाऊ गायकवाड, फिरोज शेख, रफीक शेख, किरण चाबूकस्वार,पिरप्पा सोनवणे,शब्बीर तांडूरे,आबासाहेब पाटील आदी उपस्थित होते. यावेळी गावडेवाडीच्या नूतन सरपंच संगिता पांढरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

आमदार देशमुख म्हणाले, गेल्या ७० वर्षात दक्षिण सोलापूर तालुक्याचा अपेक्षित विकास झाला नव्हता,मूलभूत सुविधा नसल्याने जनतेचे, शेतकऱ्यांचे हाल झाले.येथील राजकीय नेत्यांनी आजवर जातीपातीचे, सूडाचे राजकारण केले.

जनतेने आपल्याला निवडून दिल्यावर आपण तालुक्यात कोटयावधीचा निधी आणून समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले.गावोगावी मजबूत रस्ते झाल्याने दळणवळण वाढून आर्थिक उलाढाल वाढली आहे. लोकांचा प्रवास वेळेवर होत आहे. तालुक्यातील प्रत्येक गावांना कमीत कमी तीन ते चार कोटींचा निधी आपण दिला आहे. वडकबाळ येथे ब्रीज कम् बंधारा, सीना-भीमा जोडकालवा पूर्ण करून तालुका सुजलाम सुफलाम करण्याचा आपला मानस आहे. सध्या मतदारसंघातील वीज, रस्ते, पाणी,भूमिगत गटारी आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडविले आहे.

# ऊस बिलातून होणारी कपात तत्काळ थांबवा

## माळशिरस तालुक्यात स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक

सुराज्य/अकलूज

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत माळशिरस तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाला. मात्र तरीही शेतकऱ्यांच्या कर्जाची वसुली ऊसबिलातून बँका, सोसायट्या वसुली करत आहेत. त्याच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने माळशिरस येथे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. ही वसुली तत्काळ बंद करावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांनी दिला.

दुष्काळग्रस्त माळशिरस तालुक्यात दोन-तीन वर्ष कोरोनामुळे, नंतर दोन अवकाळी पावसामुळे शेती व्यवसायावर संकट आले. ऊस हे एकमेव पीक शेतकऱ्यांजवळ शिल्लक आहे. उसपिकावर लग्न, दवाखाना, घर खर्च चालवायचा आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर असणारे बँका, सोसायटी व इतर कर्जांची परतफेड अवघड झाली आहे. मात्र कर्जाची वसूली ऊस बिलामधून केली जात आहे. सध्या शेतकरी मोठ्या संकटात आहे. शेतमालाला हमीभाव मिळत नसून, शेतकऱ्याला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी ही कपात थांबवून शेतकऱ्यांना न्याय द्यावा असे निवेदनात म्हटले आहे.

दुष्काळ जाहीर केल्यानंतर सरकारला दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना विविध सुविधा द्याव्या लागतात.शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन करुन शेतीशी संबंधित कर्जवसुलीला स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीज बिलात ३३.५ टक्के सवलतही द्यावी लागते. असे असतानाही शेतकऱ्यांची गळचेपी कशासाठी चालू आहे? असा सवालही विचारला आहे. यावेळी अजित बोरकर, डॉ.सचिन शेंडगे, दादा काळे, राजेश खरात, सचिन बोरकर,विलास काळे, सोमेश्वर राजगे, तायापा शिंदे, बाळु वाघमोडे, मुसा शिंदे, संदीप कपने, सुभाष माने, आप्पा शिंदे, देविदास सकट, मोहसीन शेख, विनोद कांबळे, किशोर गोरवे, प्रदीप पाटील, अक्षय पाटील, विजय वाघबंरे उपस्थित होते.



अकलूजः उसबिलातून कपात थांबवण्याच्या मागणीचे निवेदन माळशिरस तहसिलदारांना देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर, डॉ.सचिन शेंडगे, दादा काळे, राजेश खरात, सचिन बोरकर आदी उपस्थित होते.

**अन्यथा उग्र आंदोलन...**

माळशिरस तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश असतानाही बँका, सोसायटी व इतर खाजगी संस्था शेतकऱ्याच्या ऊस बिलातून कपात करत आहेत, ही कपात लवकरात थांबवा अन्यथा उग्र आंदोलन केले जाईल.

**-अजित बोरकर**



# अकलूजच्या राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेला प्रारंभ

## स्पर्धा तीन दिवस, ५८ संघांचा सहभाग

सुराज्य/अकलूज

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांची जयंती, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष, जयसिंह मोहिते-पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील या बंधूंच्या अमृतमहोत्सवी वाटचालीनिमित्त संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्यावतीने आयोजित १८व्या राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेला सोमवार दि. ८ जानेवारीपासून प्रारंभ झाला.

स्पर्धा दि. ८ ते १० जानेवारी या काळात होणार आहेत. विजयचौक येथे स्पर्धेचे उद्घाटन अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्याहस्ते मैदान पूजन करून झाले. अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, मंडळाच्या कार्याध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, दीपक खराडे-पाटील, प्रदीप खरडे-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, ज्येष्ठ खेळाडू लक्ष्मण आसबे, जि.प. सदस्या सुनंदा फुले यांच्यासह सहकारमहर्षी साखर कारखाना, शिक्षण प्रसारक मंडळ व परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

जयसिंह मोहिते पाटील यांनी नेहमीच ग्रामीण कला आणि खेळांना प्रोत्साहन दिले आहे. लेझीम खेळामुळे ताण तणाव कमी होऊन व्यायामाबरोबरच आनंदही मिळतो, असे मदनसिंह मोहिते पाटील यांनी यावेळी सांगितले. दीपरतन गायकवाड यांनी ग्रामीण संस्कृती पुढे नेण्यासाठी या स्पर्धा महत्त्वाच्या आहेत, असे मत व्यक्त केले. जयसिंह मोहिते पाटील यांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

प्रस्ताविकात नामदेव कुंभार यांनी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळांने आजपर्यंत ४० हजारपेक्षा अधिक लेझीम खेळाडू निर्माण केले आहेत. ग्रीनिज वर्ल्ड बुकमध्येही अकलूजच्या महालेझीम खेळाची नोंद झाल्याचे सांगितले.

## संक्षिप्त वृत्त

### पंढरपूर सिंहगड कॉलेजमध्ये प्रविण दवणे यांचे व्याख्यान



**पंढरपूर** : सुप्रसिद्ध कवी, लेखक, व्याख्याते प्रविण दवणे यांचे व्याख्यान बुधवार, दि. १० जानेवारी २०२४ रोजी दुपारी ३ ते ५ यावेळेत सिंहगड महाविद्यालय, पंढरपूर येथे आयोजित केले आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. युवकांना दिशा व मनाला नवी उमेद देणारे प्रसन्न व खेळकर हृदयसंवाद साधणारे प्रा.प्रविण दवणे यांचे सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय व पालवी संस्था यांच्या विद्यमाने पंढरपूर सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये चला तर जगण्याचा आनंद जगतानाच घेऊयात या विषयावर व्याख्यान होणार आहे. पालवी संस्कार सेतू संस्कार, विचार, राष्ट्रनिर्माण आयोजित दीपस्तंभ मनातले, दीपस्तंभ जनातले या विषयावर प्रविण दवणे विद्यार्थी, युवक व उपस्थितांशी संवाद साधणार असून, हे व्याख्यान सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले आहे. तरी पंढरपूर व पंढरपूर परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांकडून केले आहे.



**उत्तर सोलापूरः नान्नज जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी आनंद बाजार भरविला होता.**

### नान्नज जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी भरवला आनंद बाजार

**उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथील भगतसिंगनगर नान्नज जिल्हा परिषद शाळेत बाल आनंदबाजाराचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शहानूर शेख यांच्या हस्ते झाले. बाल बाजारात शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स मांडले होते. पालकांनी बाल आनंद बाजारास उत्तम प्रतिसाद दिला. यावेळी उपाध्यक्ष सोमनाथ जाधव, इरफान शेख, सचिन भोसले, लक्ष्मण मुळे, बाबा शेख, रईस शेख, प्रशांत खुडे, केंद्रप्रमुख बापुसाहेब जमादार, हेडाव, माने, नागणे यांच्यासह पालकवर्ग उपस्थित होते. यासाठी मुख्याध्यापक लोखंडे, फुटाणे यांनी परिश्रम घेतले.

# मुस्तीमध्ये काशी जगद्गुरुंची अड्डपालखी मिरवणूक

सुराज्य/दक्षिण सोलापूर

काशिपीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ ज्ञानसिंहासनाधीश्वर डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींची अड्डपालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. यावेळी ५११कुंभधारक सुहासिनींनी सहभागी झाल्या होत्या.

प्रारंभी संयोजकांच्यावतीने जगद्गुरुंचे गावातील बसवेश्वर हायस्कूलच्या प्रांगणामध्ये स्वागत केले. त्यानंतर अड्डपालखी मिरवणूक गावातील मुख्यवेस, ग्रामपंचायत कार्यालय, नवमित्र गल्ली, तिरंगा, लोकमान्य चौक, खिंडी गल्ली, अण्णा चौक, चन्नवीर सभागृह मार्गे तीनकोणीतून बसवेश्वर हायस्कूलच्या प्रांगणात अड्डपालखीचे आगमन झाले. त्यानंतर धर्मसभेला सुरुवात झाली.

याप्रसंगी सरपंच वैशालीताई हरे, त्यांचे पती लक्ष्मन हरे या दाम्पत्यांच्या हस्ते जगद्गुरुंची पाद्यपूजा झाली. यावेळी पंचाक्षरी शिवाचार्य स्वामीजी (माळकवठे), श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी (नागणसूर), नीलकंठ शिवाचार्य स्वामीजी (मैंदर्गी), आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, गोकुळचे चेअरमन दत्ता शिंदे, वळसंगचे पोलीस निरीक्षक अनिल संगल्ले, प्रवचनकार मृगेंद्रशास्त्री हिरेमठ (उमराणी) उपस्थित होते.



**दक्षिण सोलापूरः काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामींजीची अडपालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली.**

जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी म्हणाले, मुस्ती हे गाव अध्यात्मिक, धार्मिक बाबतीत सदन आहे. याप्रसंगी नागणसूरचे श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी मैंदर्गीचे नीलकंठ शिवाचार्य स्वामीजी यांचे धर्म संदेश, आमदार सचिन कल्याणशेट्टी, गोकुळचे चेअरमन दत्ता शिंदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. महाप्रसादाची संपूर्ण व्यवस्था ज्येष्ठ नेते माजी सभापती कल्याणराव पाटील व परिवाराने केली होती. यानिमित्त माजी सरपंच नागराज पाटील यांचा सन्मान जगद्गुरुंच्या हस्ते करण्यात आला.

यासाठी परिश्रम घेतलेल्या सुनील कळके, महादेव पाटील, पंकज पाटील, पंडित कळके, शशीकांत मोरडे, शिवराज पाटील, उपसरपंच हरिष शिंदे, विजयकुमार कळके, सिद्धेश्वर कस्तुरे, उमाकांत कोरे, देवराज बिराजदार, लक्षिमन पाटील, कुमार पाटील, मारुती बिराजदार, सागर कळके, सचिन कुर्ले, अमोल पाटील, बाबा दिंडेगावे, योगी कुर्ले, भीमाशंकर हंगरगे, राज हरे, गजानन पाटील आदींचा जगद्गुरुंच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मुस्ती गावातील तत्कालीन डॉ. चंद्रशेखर हिरेमठ यांच्या होटगी मठाच्या मठाधिशांची जगद्गुरुपदी निवड व्हावी. या संकल्प पूर्तीसाठी कै. डॉ. चंद्रशेखर हिरेमठ यांची प्रतिमा त्यांचे सुपुत्र डॉ. विश्वनाथ हिरेमठ, नातू डॉ. पशुपती हिरेमठ यांना जगद्गुरुंच्या हस्ते प्रदान केले. सूत्रसंचालन अशोक कस्तुरे यांनी केले तर आभार संयोजक समितीचे सदस्य मल्लिकार्जुन मोरडे यांनी मानले.

### धर्मसंरक्षणाची जबाबदारी माता-भगिनींवर अधिक

या धर्म सभेत आशीर्वाचन देताना जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी म्हणाले, आजच्या काळात धर्मसंरक्षण करण्याची जबाबदारी पुरुष्यांपेक्षा माता भगिनींवर अधिक आहे. त्यामुळे माता भगिनींनी धर्माविषयक गोष्टींची शिकवण देणाऱ्या कथा आपल्या मुलांना वारंवार सांगाव्यात. या बाबतीत छत्रपती शिवरायांच्या जडणघडणीत यांच्या मातोश्री जिजाऊ यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या संस्कारामुळे छत्रपती शिवराय घडले. हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली, याचा दाखला त्यांनी दिला.

# खंडाळीच्या कविता हिंगमिरे नवोपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित

सुराज्य/वेळापूर

माळशिरस तालुक्यातील खंडाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका कविता धन्यकुमार हिंगमिरे यांना अग्निपंख शैक्षणिक समूह महाराष्ट्र राज्य यांच्याकडून राज्यस्तरीय नवोपक्रमशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीक्षेत्र माहूरगड येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मेनक घोष, नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मीनल करणवाल आदींच्या उपस्थितीत त्यांना पुरस्काराने सन्मानित केले.

हिंगमिरे यांचा मी इंग्रजी वाचणारच या उपक्रमाची दखल, त्यांनी विद्यार्थ्यांसाठी राबवलेले अन्य उपक्रमाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांचे माळशिरस तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, बोरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख कचरे, ग्रामपंचायत खंडाळी, जि.प.शाळा खंडाळीतील मुख्याध्यापिका सारिका महाजन, छाया पोळ, शीतल बिराजदार, शाळा व्यवस्थापन समिती, समस्त ग्रामस्थ खंडाळी, सर्व कुटुंबीय, नातलग, मित्र परिवारांनी त्यांचे कौतुक केले.



**वेळापूरः खंडाळी जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका कविता हिंगमिरे यांना राज्यस्तरीय अग्निपंख शैक्षणिक समूहाचा राज्यस्तरीय नवोपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले. त्यावेळी श्रीकृष्ण पांचाळ, मैनक घोष, मीनल करणवाल आदी.**



**पंढरपूरः स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिररिंगमध्ये निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण, पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी उद्योजक राजू खरे, अर्जुन भोसले आदी.**

# फुले-शाहू-आंबेडकर विचार मंचतर्फे निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**पंढरपूर** : पंढरपूर येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या ठिकाणी फुले, शाहू, आंबेडकर विचारमंच यांच्यावतीने २६ नोव्हेंबर २०२३ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेतील विजेते विद्यार्थी, मुख्याध्यापक, पत्रकार यांचा सन्मान सोहळा समारंभ उद्योजक राजू खरे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रथम फुले, शाहू, आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, स्वेरी कॉलेजचे संस्थापक सचिव प्राचार्य बी.पी. रोंगे, पंढरपूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याध्यापक संघ महामंडळाचे माजी अध्यक्ष सुभाषराव माने यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडल. आयोजक सिकंदर ढवळे, भालचंद्र कांबळे, सुनील वाघमारे, जितेंद्र बनसोडे, किर्तिपाल सर्वगोड उपस्थित होते. यावेळी राजू खरे यांनी चळवळीतील अनेक घडामोडींविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थी, विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले.

# पत्रकार दिनानिमित्त अक्कलकोटमध्ये पत्रकारांचा सन्मान

**अक्कलकोट** : शहा शफिलनगर येथे पत्रकार दिनानिमित्त हजरत टिपू सुलतान फाऊंडेशनच्यावतीने अक्कलकोट तालुका व शहरातील सर्व पत्रकारांचा फेटा बांधून सत्कार झाला.

यावेळी फाऊंडेशनचे सद्दाम शेख, शिव स्वामी यांच्या हस्ते दैनिक सुराज्यचे तालुका प्रतिनिधी रविकांत धनशेट्टी, ज्येष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर, स्वामीराव गायकवाड यांचा सत्कार झाला. अल्ताफ पटेल व बाबासाहेब निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. आभारप्रदर्शन मोहसीन मोकाशी यांनी केले. यावेळी सद्दाम शेख, सैपन शेख, मोहसीन मोकाशी, सोहेल फरास, गौस बागवान, मस्तकीम शेख, अकिब बागवान, मामूद शेख, शोएब बागवान, आसिफ रेड्डी आदी उपस्थित होते.



**अक्कलकोटः शहा शफिलनगर येथे पत्रकार दिनानिमित्त हजरत टिपू सुलतान फाऊंडेशनच्यावतीने अक्कलकोट तालुका व शहरातील सर्व पत्रकारांचा सत्कार झाला. त्यावेळी सद्दाम शेख, शिव स्वामी, रविकांत धनशेट्टी, बाबासाहेब निंबाळकर, स्वामीराव गायकवाड, अल्ताफ पटेल, बाबासाहेब निंबाळकर य, मोहसीन मोकाशी, सद्दाम शेख, सैपन शेख, आदी.**

# रोहन चौगुले यांची अभियंतापदी निवड झाल्याबद्दल सत्कार

सुराज्य/वेळापूर

येथील बापुराव हरी चौगुले यांचे चिरंजीव रोहन बापुराव चौगुले यांची डी-अमिको शिप इश्मा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या इंटरनॅशनल कंपनीमध्ये ट्रेनी मरीन इंजिनिअर (अभियंता) या पदावर नियुक्ती झाली. त्यानिमित्ताने त्यांच्या घरी जाऊन वेळापूर विविध कार्यकारी विकास सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने-देशमुख, वेळापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्यावतीने त्यांचा सन्मान केला.

यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय रेगुडे, पोलीस हवालदार मच्छिंद्र राजगे, राजेंद्र खंडागळे, डॉ. शिवाजी चौगुले उपस्थित होते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीची झुंज देत या पदापर्यंत पोहोचलेल्या रोहन याचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.



**वेळापूरः वेळापुरातील रोहन चौगुले यांची डी अमिको शिप इश्मा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या इंटरनॅशनल कंपनीमध्ये ट्रेनी मरीन इंजिनियरपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला. यावेळी अमरसिंह माने-देशमुख, निलेश बागाव, संजय रेगुडे, राजेंद्र खंडागळे, शिवाजी चौगुले आदी.**

# सोलापूर जिल्हास्तरीय आश्रम शाळा क्रीडा महोत्सवाला सुरुवात

सुराज्य/दक्षिण सोलापूर

सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय,सोलापूर अंतर्गत मागास समाजसेवा मंडळ, नेहरूनगर, यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच श्री.शिवाजी अध्यापक विद्यालय, नेहरूनगरच्या मैदानावर जिल्ह्यास्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. उद्घाटन सहायक संचालक मनिषा फुले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण हे होते. यावेळी कार्यकारी संचालक सचिन चव्हाण, संस्थेचे सचिव किरण चव्हाण उपस्थित होते.

मान्यवरांचे स्वागत लेझीम, बंजारा नुत्य व सैनिकी शाळेच्या लयबद्ध संचलनाने करण्यात आले. प्रास्ताविक श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माध्यमिक आश्रम प्रशालेच्या मुख्याध्यापिका अश्विनी चव्हाण यांनी केले. यावेळी मनिषा फुले, सुभाष चव्हाण यांनी केले. आभारप्रदर्शन सचिन चव्हाण यांनी केले. मुख्याध्यापिका ज्योती चव्हाण, महेश सरवदे, जब्बार शेख, अशोककुमार, सुरज चव्हाण, दत्ता वानकर, दत्तात्रय शिंदे उपस्थित होते.



**दक्षिण सोलापूरः जिल्ह्यास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मनिषा फुले, सुभाष चव्हाण, सचिन चव्हाण आदींसह मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.**

## रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम: ६०० महिलांची उपस्थिती

# वेळापुरात ५० विधवा भगिनींचा सौभाग्य अलंकार, हळदी कुंकुवाने झाला सन्मान

सुराज्य/वेळापूर

वेळापूर (माळशिरस) येथील इंद्रनील मंगल कार्यालय येथे स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने विधवांसाठी आयोजित हळदी कुंकूवाच्या समारंभात ६०० जणींना सौभाग्य अलंकर, हळदी कुंकू लाऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी अल्लडवाड, स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा साधना बनकर, जिजाऊ फाऊंडेशन पुण्याचे अध्यक्ष ज्योती धमाळ, नदाफ, सायरा मुलाणी, अनिता सावळकर, निवृत्ती बनकर, कृष्णा माळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी ५० विधवा महिलांना सुवासिनींचे अलंकार साडी, बांगड्या देऊन सुवासिनी महिलांच्या हस्ते त्यांचा हळदी कुंकू लाऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष साधना बनकर म्हणाल्या की, अनिष्ट विधवा प्रथा प्रतिबंध यावर काम सुरु केले असून, त्यातून विधवा महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून स्वतःचे दुःख कमी होऊन आनंद मिळतो. सुख आणि दुःख प्रत्येकाच्या आयुष्यात येत असते. टर्निंग पॉईंट आयुष्यात येतात. तेथून आयुष्याला वेगळे वळण लागते. दि. ३ नोव्हेंबर २०२१ रोजी आमच्या गाडीला अपघात होऊन माझे पती स्वर्गवासी झाले. खरंतर दुःख खूप मोठे होते. ते पचवणे, त्याहीपेक्षा मोठे होते. परंतु मनामध्ये एवढे विचार होते, त्या विचारांची घालमेल सुरु होती. माझ्या बाबतीत असे का घडले असावे, यातून बाहेर कसे पडायचे. असा प्रश्न मनामध्ये सारखा पडायचा. सुदैवाने माझ्या कुटुंबाचा मोठा आधार होता, पण अशा ज्या महिला आहेत ज्यांना कसलाच आधार नाही, अशा महिला समाजात आहेत. माझा विचार त्यांच्या दिशेने जायला लागला.

माझे दुःख थोडे कमी झाल्याचे जाणवले. त्यामुळे समाजातील अशा गरजू महिलांचा विचार सुरु केला. स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मुलांना सायकल वाटप, शालेय साहित्याचे वाटप, विधवा महिलांचा सौभाग्य अलंकार व हळदी कुंकू लावून सन्मान असे सामाजिक कार्यक्रम सुरू केले आहेत.

यावेळी वंदना साठे, मनिषा थिटे, कांचन बावळे, ज्योती धुमाळ, अनिता सावळकर, ग्रामपंचायत सदस्या प्रियंका आडत, सीमाताई खाडे, नीलम बनसोडे, अशोक पवार आदींनी मनोगते व्यक्त केले. यासाठी अर्चना उरणे, नफिसा शेख, सायरा मुलाणी, नीलम बनसोडे, स्मिता पिसे, नदाफ शेख, दुर्गा बनसोडे, माधुरी मोरे, आरिफा तांबोळी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन लक्ष्मीकांत कुलकर्णी, संध्या माळी यांनी केले. शेवटी सर्वांना हळदी कुंकू लावून भेटवस्तू देण्यात आली.




**वेळापूरः वेळापूर (माळशिरस) येथील इंद्रनील मंगल कार्यालय येथे स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने विधवांसाठी आयोजित हळदी कुंकूवाच्या समारंभाप्रसंगी ज्योती धमाळ, बालाजी अल्लडवाड, साधना बनकर, नदाफ, सायरा मुलाणी, अनिता सावळकर, निवृत्ती बनकर, कृष्णा माळी आदी.**

### विधवा महिलांना सौभाग्याचे अलंकार, हळदी कुंकुवाचा मान प्रेरणादायी

स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून गेली तीन वर्षांपासून विधवा महिला अनिष्ट विधवा प्रथा प्रतिबंध यावर काम केले जात आहे. त्यामध्ये अनेक महिला स्वतःहून पुढे येऊन सौभाग्याचे अलंकार घालत आहेत. विधवा महिलांना सौभाग्याचे अलंकार, हळदीकुंकूवाचा मिळालेला मान, त्यांच्या चेहऱ्यावरील दिसलेला आनंद हा या महिलांसाठी काम करण्यासाठी ताकद, प्रेरणा देणारी ठरतेय. ज्या महिलांनी सौभाग्य अलंकार परिधान केले, समाजातून स्वतः त्यांना हळदी कुंकू लावले जातेय. सुवासिनींच्या कार्यक्रमांमध्ये त्यांना सहभागी करुन घेतले जात आहे. हा बदल समाजामध्ये होताना दिसून येतोय. हा बदल खूपच चांगला आहे. वेळ लागतोय पण हळूहळू पुढे जातोय. परंतु बदल होणे काळाची गरज आहे. आपण देवीला हळद कुंकू लावतो, मग विधवा भगिनीला का नाही, याचे आत्मचिंतन पुरुषांनी, महिलांनी करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा साधना बनकर यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### आर्टिस्टिक योगासन प्रकारात जान्हवी चंदनशिवे राज्यात तिसरी

**सोलापूर** : मिनिस्टर ऑफ युथ अफेयस अँड स्पोर्ट्स गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अंतर्गत अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग योगासन स्पर्धा ध्रुव ग्लोबल स्कूल संगमनेर येथे आयोजित केल्या होत्या. अस्मिता खेलो इंडिया महाराष्ट्र आर्टिस्टिक सिंगल योगा प्रकारात उमाबाई श्राविका ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थी जान्हवी चंदनशिवे हिने १२ ते १८ वर्षे वयोगटांमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. तिची मध्यप्रदेशातील जबलपूर येथे १२ ते १४ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या वेस्टझोन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जान्हवी ही स्नेहसाधना योगा क्लासेस येथे रोहन व सारिका घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे तसेच तिला खेलो इंडिया पंच स्नेहल पेंडसे व साधना काकडे यांनी शुभेच्छा दिल्या.




### नेताजी सुभाषचंद्र बोस स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

**सोलापूर** : नीलमनगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस इंग्लिश मिडीयम स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विस्तार अधिकारी बापूराव जमादार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवणसिद्ध रोडगीकर, सुभाष धुमशेट्टी सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत त्रिशूले, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सतीश इंजामुरी, माता पालक संघाच्या सदस्या स्नेहा कुनी उपस्थित होते. प्रथम प्रमुख अतिथींच्या हस्ते योगीराजेंद्र महास्वामीजी व वीरतपस्वी महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन, रंगमंच पूजन व फित कापून स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांनी अहवाल वाचनातून शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी गणपती, भारतीय वेशभूषा, विदेशी वेशभूषा, तेलुगू रिमिक्स, शेतकरी नृत्य, हृदयी वसंत फुलताना, देशभक्तीपर तसेच विविध भाषेतील चित्रपटातील गाण्यांवर आधारित सुंदर नृत्य सादर केले. या स्नेहसंमेलनात नर्सरी ते आठवीपर्यंतच्या २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.


### चैतन्य पतसंस्थेची दामदुप्पट ठेव योजना



**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील चैतन्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्यावतीने मुलींच्या शैक्षणिक व वैवाहिक आर्थिक गरजा पूर्ण व्हाव्यात, म्हणून लेक लाडकी दामदुप्पट ठेव योजना सुरु केली आहे, असे मत चेअरमन रामचंद्र ऊर्फ नानासाहेब देशमुख यांनी सांगितले. यामध्ये वयोमर्यादा ० ते १८ वर्षाच्या आतील मुलींच्या नावे जर ६ वर्षे ७ महिने (२४७५) दिवस जर पैसे ठेवले तर त्यांच्या दुप्पट रक्कम मुदत संपल्यावर देणयात येणार आहे. या योजनेमध्ये व्याजदर १०.५ टक्के एवढा असेल. मुलींना शैक्षणिक मदत किंवा विवाहाच्यावेळी सदर पैशांचा उपयोग व्हावा, म्हणूनच ही योजना पतसंस्थेने सुरु केली आहे. हा निर्णय सर्व संचालक मंडळाने घेतला आहे. तरी पिलीव परिसरातील लाभार्थी, ग्रामसथांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन चैतन्य पतसंस्थेचे चेअरमन रामचंद्र ऊर्फ नानासाहेब देशमुख यांनी केले आहे.

## निधन वृत्त

### हसतमबी खाटीक



**आटपाडी** : येथील हसतमबी दादामियाँ खाटीक यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सादिक खाटीक, सामाजिक कार्यकर्ते अनिस खाटीक यांच्या त्या सख्ख्या आत्या होत.

### शोभना सोंडेकर



**सोलापूर** : लष्कर येथील शोभना मोहन सोंडेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, ५ मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे. मोची समाज सुधारक मंडळाचे माजी अध्यक्ष मोहन सोंडेकर यांच्या त्या पत्नी होत.

### वासुदेव संगा



**सोलापूर** : शहर काँग्रेस कमिटी सी ब्लॉकचे उपाध्यक्ष सत्यनारायण संगा यांचे वडील वासुदेव केशव संगा यांचे दि. ८ जानेवारी रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि.९ जानेवारी रोजी अक्कलकोट रोड येथील पद्मशाली स्मशानभुमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

# मोदींनी तळागाळातील जनतेला न्याय दिला : आ.कल्याणशेट्टी

## तांदुळवाडी येथे शासन आपल्या दारी; १०४ रक्तदात्यांनी केले रक्तदान

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तळागाळातील जनतेला न्याय देऊन भारत देश विकसनशील केला असल्याचे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी तांदुळवाडी येथील शासन आपल्या दारी योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या भाजपा जिल्हा चिटणीस सिद्धाराम हेले यांच्या वाढदिवसानिमित्त बोलताना व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी होते.**

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी सांगायचे दहा रुपये दिल्लीतून जातो तेव्हा तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोहोचायला एक रुपया होतो, त्यावेळी ती परिस्थिती ही खरी होती एक रुपयाला एक रुपया जनतेच्या खात्यात जायचे असेल तर कुठेतरी राजकारणी प्रशासन व जनतेनेही एक पाऊल पुढे यावे लागते.

कधीकाळी योजना यायच्या जायच्या व एजंट पाचशे रुपये घेऊन कोणाचे काम करायचा कोणाचे नाही. त्या काळात जनतेचा आमदार खासदार वर विश्वास नसायचा पण त्या एजंटावर विश्वास असायचा



परंतु आता तो काळ राहिला नसून हा मोदी काळ असून दिल्लीतून थेट जनतेच्या खात्यात पैसे जमा होत आहेत. असेही त्यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चालू केलेल्या योजना या तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचत आहेत व त्याचा उपयोगही चांगल्या कामासाठी होत असून भारत देश विकसनशील राष्ट्र म्हणून ओळखला जात आहे. एक रुपयामध्ये पिक विमा, जलजीवन ची कामे, रस्ते आरोग्य, पाणी, वीज आधी योजना या चांगल्या प्रकारे राबवल्या जात आहेत. मागील ७५ वर्षात या योजना आपल्यापर्यंत येऊ दिल्या नाहीत परंतु आता या योजनेचा पुरेपूर लाभ हा जनतेला होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी ३७६ रुग्णांची तपासणी करण्यात आली,प्रधानमंत्री मातृत्व योजना ६, आयुष्मान कार्ड वाटप २२०, महाराष्ट्र बांधकाम कामगार मंडळ २५, आधार कार्ड अपडेट २६, संजय गांधी निराधार वाटप २५, तहसीलदार उत्पन्न दाखले १०, पी एम किसान ९, मनोरमा जॉब कार्ड ७, नवीन आयुष्मान कार्ड नोंदणी १५६, सातबारा वाटप २०, बेबी किट १० आदी विविध योजनेचे वाटप यावेळी करण्यात आले.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सिद्धाराम हेले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले असून आपणही समाजाचे काहीतरी देणे असतो हे या आजच्या वाढदिवसा दिवशी आपल्याला दिसून आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. खासदार जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनीही यावेळी आयोजित केलेल्या शासन आपल्या दारी योजनेच्या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत केले.

यावेळी खासदार जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, दक्षिण तहसीलदार किरण जमदाडे, अण्णाराव बाराचारी, शिरीष पाटील, सुधीर माळशेट्टी, मधुकर चिवरे, राम होनराव, इरेशा अंबारे, कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर, महेश पाटील, विश्रांत गायकवाड, राजश्री येणगुरे, इंदुमती माताटे, तांदुळवाडीचे सरपंच सरोजा आवारे, वैशाली पाटील, सोमनाथ देशमाने, राजकुमार काकडे, नेताजी खंडागळे, गिरीश सोनटक्के, सोमनाथ पटणे, श्रीमंत हक्के, लक्ष्मण हक्के, सागर खांडेकर, श्रीकांत टोपणदार, बसवेश्वर कराळे, कल्याणी भडंगे, सुनील स्वामी, राजेंद्र कोरे, योगेश पैलवान, संगप्पा कराळे, सोमनाथ सुतार, लक्ष्मण वायचाळे, वैभव बामणकर व सिद्धाराम हेले मित्र मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी यावेळी परिश्रम घेतले तर आभार शिवराज माळशेट्टी यांनी केले.

# पत्रकारांची गळचेपी सुरु : सुशीलकुमार शिंदे

## पत्रकार दिनानिमित्त शहर काँग्रेसतर्फे पत्रकारांचा सन्मान



**पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार करताना आ. प्रणिती शिंदे. यावेळी सुशीलकुमार शिंदे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार आदी मान्यवर.**

सुराज्य/सोलापूर

पत्रकार हे समाजाचे, राजकारणाचे मित्र असतात. वास्तव दाखविण्याचा प्रयत्न करत असतात. पूर्वी त्यांना स्वातंत्र्य होते. पण आजच्या जमान्यात त्यांची गळचेपी केली जात आहे. सोलापूरच्या पत्रकारांनी नेहमीच सत्य परिस्थिती मांडली, याही पुढे करतील, असा विश्वास माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केला.

पत्रकार दिनानिमित्त सोलापूर शहर, जिल्ह्यात विविध प्रसार माध्यमांत कार्यरत पत्रकार व प्रेस फोटोग्राफर यांचा सन्मान कार्यक्रम शिंदे यांच्या हस्ते झाला. काँग्रेस भवन सोलापूर शहर येथे झालेल्या सोहळ्यात आमदार प्रणिती शिंदे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांच्यासह ज्येष्ठ नेते उपस्थित होते. सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रास्ताविक चेतन नरोटे यांनी केले.

# देशातील आजची स्थिती वाईट : प्रणिती शिंदे

सुराज्य/सोलापूर

देशातील आजची स्थिती खूपच वाईट आहे. देशात २०२४ नंतर निवडणुका होतील की नाही याची शाश्वती नाही. सर्वसामान्यांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जाण्याची शक्यता आहे. लोकशाही वाचविण्याच्या या लढाईत कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी काम करावे, असे आवाहन काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी रविवारी दि. ७ जानेवारी रोजी केले.

राजमाता जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्यावतीने विविध पुरस्कार देऊन मान्यवरांचा गौरव करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होते. अध्यक्षस्थानी कास्ट्राईब संघटनेचे प्रदेश सरचिटणीस आकाश तांबे होते. कार्यक्रमाला कास्ट्राईब जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, गोंदियाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल कोरे,



**कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात आमदार प्रणिती शिंदे, आकाश तांबे, सुरेश हसापुरे, कादर शेख, श्रीशैल कोरे आदींसह पुरस्कारार्थी.**

सचिव सोमलिंग कोळी, बाजीराव प्रज्ञावंत, प्रशांत मोरे, संजय खरात, उमेश गायकवाड उपस्थित होते. याप्रसंगी तुकाराम जाधव यांचे व्याख्यान झाले.

मी अनुसूचित जाती समितीची अध्यक्षा होते. या काळात राज्यभरातील विविध प्रकरणे माझ्यासमोर आली, असेही आ. शिंदे म्हणाल्या. सूत्रसंचालन मंजुषा कलशेट्टी, संगीता पाटील यांनी केले.

### विविध मान्यवरांचा गौरव

सावित्रीची लेक पुरस्कार : शिवलिंगव्वा बेडगनूर, फातिमा की बेटी पुरस्कार : हजुमा राजूमिया शेख (मरणोत्तर), क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत शिक्षक : प्रतिभा शिंदे (मंद्रुप), अतहर दफेदार (शिक्षणविस्तार अधिकारी, सोलापूर), सिराज नदाफ (मजरेवाडी), दयानंद कोळी (हालहळ्ळी), रेवती ताटवडे (शावळ), स्नेहल गायकवाड (समर्थनगर, मोहोळ), मंगल बनसोडे (चोखामेळानगर), अर्चना चंदनशिवे (गुरसाळे, पंढरपूर), राखी सोळाउंडे (सदाशिवनगर), वंदना नवगिरे (भोसरे), सुवर्णा आळसंदे (सोलापूर). गुणवंत डॉक्टर : डॉ. औदुंबर मस्के (शासकीय महाविद्यालय सोलापूर), गुणवंत पत्रकार : राकेश कदम, गुणवंत कर्मचारी : दीपक सोनवणे.

# पत्रकारितेचा पाया भक्कम करण्यात जांभेकरांचा मोलाचा वाटा



सुराज्य/अक्कलकोट

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिवस साजरा करण्यात येतो. त्यांनी मराठी पत्रकारितेचा पाया भक्कम करण्यासाठी मोलाचे कार्य केले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून अक्कलकोट आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी अक्कलकोट तालुक्यातील सर्व पत्रकाराचे सन्मान करून सत्कार केले.

यावेळी तालुक्यातील विविध विषयावर पत्रकरासोबत संवाद साधला. यावेळी सचिन बनसोडे यांनी पत्रकारांना शुभेच्या दिले. यावेळी कमलाकर सोनकांबळे, प्रवीण देशमुख, बाबा निंबाळकर, शिवानंद फुलारी, अरविंद पाटील, मारुती बावडे, गौतम बाळशंकर, सचिन बनसोडे, महेश गायकवाड, रविकांत धनशेट्टी, बसवराज बिराजदार, नंदकुमार जगदाळे, स्वामीराव गायकवाड, रमेश भंडारे, राजेश जगताप, शिवानंद याळवार, शिवानंद गोगांव, यशवंत पाटील यांच्यासह राजकुमार झिंगाडे, प्रकाश पाटील, चंद्रकांत दसले, नागेश कलशेट्टी आदी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी पत्रकार दिनानिमित्त तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा देण्यात आले.

# 'सोलापुरात टेक्निकल टेक्स्टाईल पार्क सुरु करा'

सुराज्य/सोलापूर

सोलापुरात टेक्सटाईल उद्योगातून तब्बल ८० हजार जणांना रोजगार मिळाला आहे. केंद्र व राज्यसरकारांनाही या उद्योगातून सोलापूरमधून मोठ्या प्रमाणात कर मिळत आहे. सर्व तंत्रज्ञानाने सिद्ध असलेल्या सोलापुरला टेक्निकल टेक्सटाईल्स पार्क मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र व राज्यसरकारांनी ते सोलापुरला मिळवून द्यावे, अशी मागणी सोलापूर यंत्रमाग संरक्षण समितीचे अध्यक्ष अनिल पल्ली यांनी केली आहे.

टेक्निकल टेक्सटाईल्स पार्क झाल्यास सोलापुरात किमान एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून नवीन किमान दहा हजार रोजगार निर्माण होतील, असेही पल्ली यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री पियुष गोयल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना याबाबत मागणी केली आहे.

# समाजसुधारकांना जातीपातीच्या भिंतीत बांधणे चुकीचे : हिवरकर-पाटील

सुराज्य/नातेपुते

सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या समाज सुधारणेमुळे आज महिला विविध पदांवर काम करताना दिसतात. फातिमा बेबी कौर याही शिक्षिका आणि मुख्याध्यापिका झाल्या. त्यामुळे कोणत्याही समाजसुधारकांना जातीपातीच्या भिंतीत बांधू नये, असे मत शिवसेनेचे माळशिरस तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी नातेपुते ग्रामीण रुग्णालयातील



**ग्रामीण रुग्णालयातील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना शिवसेनेचे माळशिरस तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील. यावेळी पोपट शिंदे, दादा मुलाणी, सनी बरडकर, राजू मुलाणी, डॉ. नम्रता होरा.**

कार्यक्रमात व्यक्त केले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली गरोदर मातांची तपासणी व ज्येष्ठ नागरिक माता-भगिनींना गुलाब पुष्प देऊन सत्कार केला.




# स्वेरीतील जावा स्पेशलायझेशनविषयक कार्यशाळेला प्रतिसाद

**पंढरपूर** : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्रीविठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागात 'ऑब्जेक्ट ओरिएंटेड प्रोग्रामिंग इन जावा स्पेशलायझेशन' या विषयावर दहा दिवसीय झालेल्या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद लाभला.

स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजित कार्यशाळेचे उद्‌घाटन पुण्यातील सॉफ्टेक सोल्यूशन अँड ट्रेनिंगचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिवकुमार स्वामी यांनी केले. आय. टी. क्षेत्रात आवश्यक जावा या भाषेमधील जावा आणि स्ट्रिंग्सच्या मूलभूत गोष्टींवर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांना जावा या भाषेमधील वेगवेगळ्या प्रकारच्या ऑपरेशन्ससह फाइल हाताळणीचे प्रशिक्षण दिले गेले. विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या प्रकारचे ऑपरेशन प्रात्यक्षिकासह करून घेण्यात आले.

# वेळापूरच्या मुलींचे लंगडीमध्ये जिल्हास्तरीय अजिंक्यपद

सुराज्य/वेळापूर

सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत भरविलेल्या क्रीडा स्पर्धेत लंगडी विभागात मोठ्या गटातील वेळापूर मुलींच्या शाळेने पापरी मोहोळ संघाचा तीन मिनिटे राखून धुव्वा उडवत अजिंक्यपदाचा चषक उंचावला.

कर्मवीर क्रीडा संकुल बार्शी येथे शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या मैदानावर या स्पर्धा झाल्या. गत दोन वर्षात सलग दोन वेळा उपविजेतेपद मिळविलेल्या वेळापूर मुलींच्या शाळेतील संघाने यंदा उपांत्य फेरीत दक्षिण सोलापूर संघावर तर अंतिम फेरीत पापरी तालुका मोहोळ संघावर मात केली. अंतिम सामन्यासह स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून साक्षी साठे हिचा गौरव करण्यात आला. काजल निषाद हिने प्रतिनिधिक मनोगत व्यक्त केले.

विजेत्या संघाला बार्शीचे गटशिक्षणाधिकारी सुहास गुरव, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य पोरे यांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आला. शिक्षण विस्ताराधिकारी जरीचंद चौधरी, केंद्रप्रमुख छगन गवारे, ज्ञानेश्वर जाधव, राजीव कांदे, उत्तम धोत्रे, साधन समूह केंद्राचे विठ्ठल गवळी, क्षीरसागर उपस्थित होते.

संघाला क्रीडाशिक्षक नितीन चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षक राजेंद्र जाधव, अशोक पवार, प्रज्ञा इंगोले, कृष्णदेव तुपे, प्रवीणकुमार पांगे, स्वयंसेविका प्रणाली गाडवे, वर्षा बाबर यांची साथ मिळाली. संघाचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, शिक्षण विस्ताराधिकारी करडे, केंद्रप्रमुख महादेव घोगरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रणजीत सरवदे,



उपाध्यक्ष सुनील साठे, मुख्याध्यापक कोंडीबा सरतापे यांनी अभिनंदन केले. विजेत्या संघात साक्षी साठे (कर्णधार), विद्या भगत (उपकर्णधार), काजल निषाद, प्रतीक्षा वाघमारे, पूजा माने, श्रावणी जाधव, ज्योती भगत, पायल साठे, अंकिता घाडगे, प्रज्ञा जाधव, सह्याद्री साठे, सिद्धी भगत यांचा समावेश होता.

## संक्षिप्त वृत्त

### जीडीसी अँड ए,सीएचएम परीक्षा; ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन

**सोलापूर** : शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी.डी.सी.अ‍ॅन्ड ए बोर्ड) यांचेकडून घेण्यात येणारी शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी.अ‍ॅन्ड ए) परिक्षा व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम) परिक्षा दिनांक २४, २५ व २६ मे २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. परिक्षणार्थीकडून ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. ऑनलाईन व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे या परिक्षेसाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, तसेच ऑनलाईन अर्ज https://edca.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरच भरता येईल. परिक्षार्थीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत सविस्तर अधिसुचना खात्याच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज दिनांक ५.१.२०२४ ते १५.०२.२०२४ या कालावधीत करता येतील. अधिक माहितीसाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी, संस्था, सोलापूर कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ई ब्लॉक, जूने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवरून संपर्क साधावा, कार्यालयीन दुरध्वनी क्र.०२१७-२६२९७४९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी कळविले आहे.

### रेल्वे सल्लागार समिती सदस्यपदी डोंगरेश चाबुकस्वार



**सोलापूर** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील टिकेकरवाडी रेल्वे स्टेशनच्या सल्लागार समिती सदस्यपदी डोंगरेश चाबुकस्वार यांची निवड केली. डोंगरेश चाबुकस्वार यांनी यापूर्वी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच अनेक सामाजिक संस्था, संघटनांमध्ये सामाजिक कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन टिकेकरवाडी रेल्वे स्थानकाच्या सल्लागार समिती सदस्यपदी त्यांची निवड झाली. निवडीबद्दल आ. सुभाष देशमुख, आ. राम सातपुते, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख यांनी अभिनंदन केले.

# पोलीस रेझिंग डे : ४७ गुन्ह्यातील ६९ लाखांचा ऐवज फिर्यादींना केला परत







सुराज्य/सोलापूर

**पोलीस आयुक्तालयात पोलीस रेझिंग डे निमित्त फिर्यादींना ४७ गुन्ह्यातील ६९ लाखांचा ऐवज फिर्यादींना समारंभपूर्वक देण्यात आला. कार्यक्रम पोलीस आयुक्त पोलीस आयुक्त डॉ.माने यांच्या हस्ते करण्यात आला.**

यावेळी व्यासपीठावर पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त राजन माने, अशोक तोरडमल, अजय परमार, प्रांजली सोनवणे यांची उपस्थिती होती. यावेळी पोलीस आयुक्त डॉ. माने यांच्या हस्ते यावेळी डॉ. माने म्हणाले, पूर्वी चोरी, घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणल्यानंतर त्यातील मुद्देमाल फिर्यादींना परत लवकर मिळायला उशीर लागायचा, परंतु आता ही प्रक्रिया सोपी झाली आहे. पोलीस किंवा न्यायालयाच्या आदेशाने तो ऐवज फिर्यादींना लवकर परत देता येतो. बंगला, दुकानांचे मालक परगावी जाताना मोठी एसी गाडी घेऊन जातो, जर हौसमौज करताना आपण अधिक खर्च करत असाल तर सुरक्षित साधनांसाठी खर्च केला पाहिजे. वाहनांचे हॅन्डल लॉक तोडून गा×ड्या चोरुन नेल्या जातात, परंतु त्यासाठी ४०० ते ५०० रुपयांचे व्हिल लॉक बसवले जात नाही. घरासाठी सेफ्टी डोअर बसवले पाहिजे, परगावी जाताना दरवाजे नीट लावला की नाही ते पाहिले पाहिजे. शेजाऱ्यांना सांगितले पाहिजे. किंबहुना पोलीस ठाण्यातही कळवले पाहिजे. चोरी रोखणे ही आपलीही जबाबदारी आहे, जेवढी आपण काळजी घेतली पाहिजे तेवढी घेतली जात नाही, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविक करताना पोलीस उपायुक्त डॉ. काळे म्हणाल्या, दुकानांसमोर सीसीटीव्ही असतात परंतु अनेक सोसायटीत सीसीटीव्ही नाहीत. त्यामुळे चोर्या उघड करणे अवघड असते. मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्हीचा आधार घेऊन आरोपींचा शोध घ्यावा लागतो. चोरटे परजिल्हा, राज्यात पळून जातात. तेथून त्यांना पोलीस पकडून आणतात. आरोपींना शिक्षा लागण्यासाठी फिर्यादींनी चांगला जबाब द्यावा, सोलापुरात गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ६० टक्के इतके आहे. सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांनी केले तर आभार आयुक्त प्रांजली सोनवणे यांनी मानले.



## उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सोलापूरला नाट्य संमेलन हस्तांतरण

सोलापूरः कला, साहित्य, नाटक, संगीत या गोष्टी समृद्ध परंपरेचा वारसा सांगतात. हा वारसा जपताना आपल्या समाजाला समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे शासनाचे कर्तव्य असून या कर्तव्यभावनेतून शासन नाट्य चळवळीच्या पाठीशी उभे राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या शतकमहोत्सवी संमेलनात दिली. तर मराठी नाट्यचळवळ अधिकाधिक बहरेल असा विश्वास सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

मोरया गोसावी क्रीडा संकुल चिंचवड येथील आद्य नाटककार विष्णुदास भावे रंगमंचावर १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या हस्तांतरण सोहळ्यामध्ये उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, नाट्य संमेलनाध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, भाऊसाहेब भोईर, आ. उमा खापरे उपस्थित होते. यावेळी संमेलन सोलापूरला हस्तांतरित करण्यात आले.

सोलापूरच्या शंभराव्या नाट्य संमेलनाचे प्रमुख कार्यवाह विजय साळुंके, कोषाध्यक्ष दिलीप कोरके, सहकार्यवाह सुमित फुलमामडी, तेजस्विनी कदम, समन्वयक कृष्णा हिरेमठ यांच्याकडे नाट्य संमेलनाची नटराज मूर्ती व नाटकाची घंटा सुपूर्द करण्यात आली.

### १०० वे नाट्य संमेलन केशराने बहरलेले उद्यान

प्रेक्षकांच्या जो निकट असतो तो अभिनेता असतो असे नमूद करून उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, समाजात संवेदनशीलता रहावी यासाठी नाट्य कलावंताचे कार्य महत्वाचे आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेकडे संवेदनशीलता नसल्याने कृत्रीम बुद्धीमत्ता कितीही विकसीत झाली तरी कला, नाटक, गीत, संगीत यावर परिणाम होणार नाही. अण्णासाहेब किर्लोस्कार यांनी नाट्य संमेलनाला ‘केशराचं शेत’ ही उपमा दिली आहे आणि १०० वे नाट्य संमेलन म्हणजे ‘केशराने बहरलेले उद्यान’ आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

# तबबल १४५ जणांची एकसष्ठी झाली साजरी

## एकाच कार्यक्रमात हरिभाई देवकरण प्रशालेच्या १९७८ ग्रुपचा उपक्रम

सुराज्य/सोलापूर



कोणी अमेरिकेहून तर कोणी ऑस्ट्रेलियाहून, कोणी मध्य प्रदेशातून तर कोणी राजस्थानातून आलेल्या तब्बल १४५ मित्रांची एकसष्ठी एकत्रच साजरी झाली. निमित्त होते ह. दे. १९७८ ग्रुपने आयोजिलेल्या स्नेह मेळाव्याचे.

सोलापूर शहरालगत पाकणी येथील अभिषेक मळा येथे हा अनोखा कार्यक्रम झाला. १९७८ साली हरिभाई देवकरण प्रशालेतून १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ह.दे. १९७८ ग्रुप बनविला आहे. यातील सर्व सदस्यांनी यंदाच्यावर्षी वयाची ६१ वर्षे पूर्ण केली आहेत. त्यानिमित्त १४५ मित्रांनी एकत्र येत हुरडा पार्टी आणि स्नेह मेळावा आयोजित केला होता.

यावेळी डॉक्टर, वकिल, उद्योजक, प्रोजेक्ट मॅनेजर, प्राध्यापक, राजकीय, सामाजिक अशा सर्व स्तरांतील माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी अभिषेक मळाचे संचालक राजू भंडारकवठेकर यांनी ६१ कणकेचे दिवे बनवून सर्वांना सपत्नीक ओवाळले. या माजी विद्यार्थ्यांनी क्रिकेटसह विटी दांडूसारखे अनेक खेळ खेळून पुन्हा लहान होण्याचा आनंद लुटला. याप्रसंगी परिसरातून या माजी विद्यार्थ्यांची मिरवणूकही काढण्यात आली.

या स्नेह मेळाव्यासाठी सोलापूरसह अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मध्य प्रदेश, राजस्थान, मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, छत्रपति संभाजी नगर, हैद्राबाद, सुरत आदी ठिकाणहून माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी मोहन डांगरे, प्रशांत बडवे, विठ्ठल कुलकर्णी, स्मिता पुरंदरे, प्रशांत देवस्थळी, मनीषा चारीवाले, कल्पना जक्कल, सुरेखा पुजारी - शर्मा, ड. बिपिन ठोकळ, अभय देसाई, सुजाता कामत, डॉ. मुकुंद राय, उल्हास सोनी, भूषण शहा उपस्थित होते.

### आई प्रतिष्ठानला ३० हजारांची देणगी

पुण्यातील स्मिता पुरंदरे संचलित सामाजिक कार्यकर्त्यांच्या समूहाकडून ३० हजार रुपयांची देणगी आई प्रतिष्ठानला देण्यात आली.

### दिवसभर मोबाईलला ठेवले दूर

ह. दे. १९७८ ग्रुपच्या स्नेह मेळाव्यासाठी उपस्थित राहिलेल्या माजी विद्यार्थ्यांनी दिवसभर मोबाईल दूर ठेवण्याचा निश्चय केला होता. त्यानुसार संपूर्ण दिवस मोबाईलपासून दूर राहत मोबाईलचा अतिवापर टाळण्याचा संदेश या माजी विद्यार्थ्यांनी दिला.

## ऊसतोड मजूर देतो म्हणून २४ लाखाची फसवणूक

**सोलापूर** : ऊस तोड टोळी देतो म्हणून पैसे घेऊन सुद्धा टोळी दिली नाही. त्यामुळे २४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची फिर्याद मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. वरवडे (मोहोळ) येथील अशोक श्रीमंत हांडे (वय-३६) हे शेती करतात.

त्यांनी ऊस तोडीचा व्यवसाय करण्यासाठी विनायक विठ्ठल राठोड याच्याशी संपर्क केला आणि १५ जुलै २०११ रोजी त्याला १० लाख रुपये रोख दिले. त्यानंतर २२ जुलै ते ८ ऑक्टोबर २०२१ यादरम्यान टप्प्याटप्प्याने बँक खात्यातून १४ लाख रुपये रोख दिले आणि ऊस तोडणीची टोळी घेऊन येण्यास सांगितले. आज येतो उद्या येतो म्हणून त्यांनी टोळी आणलीच नाही आणि पैसे देतो देतो देतो असे म्हणून नादी लावले. शेवटी वाट पाहून त्याच्याविषयी मोहोळ पोलिस ठाण्यात २४ लाखाची फसवणूक झाल्याची फिर्याद दाखल केली आहे.

# पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल वरवडेच्या कोमल घाडगेचा सत्कार

सुराज्य/टेंभुर्णी



वरवडे (ता. माढा) येथील हॉटेल व्यवसायिक नवनाथ घाडगे यांची सुकन्या कोमल घाडगे यांची नुकतीच पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. त्याबद्दल आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी कोमल घाडगे यांचे अभिनंदन केले.

यावेळी प्रमाणिक व कर्तबगार पोलीस अधिकारी म्हणून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देतील असा विश्वास व्यक्त करत आ. मोहिते-पाटील यांनी पुढील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी अकलूजचे सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, नवनाथ घाडगे, सुरेखा घाडगे, भाजपा माढा तालुका उपाध्यक्ष सोमनाथ गायकवाड, केळी उत्पादक संघ माढा तालुका अध्यक्ष केशव गायकवाड, संतोष चोपडे, मोहन जगताप, बंटी गायकवाड, शंकर कासविद, सरस्वती गायकवाड आदी उपस्थित होते.

# दूध अनुदानात अटी-शर्तींची आडकाठी!

## अनुदान केवळ एका महिन्यासाठी; किती शेतकऱ्यांना होणार फायदा?

सुराज्य/सोलापूर



दुधाचे दर कमी झाल्यामुळे राज्य सरकारने खासगी व सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिलीटर ५ रूपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला असला तरी हे अनुदान मिळवणे शेतकऱ्यांसाठी म्हणावे तेवढे सोपे नाही. या निर्णयामध्ये सरकारने अनेक आडकाठ्या घालून ठेवल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. विशेष म्हणजे हे अनुदान केवळ एका महिन्यासाठी असणार आहे.

मागच्या तीन महिन्यांपासून सुरू असलेले आंदोलन सरकारने अनुदान जाहीर केल्यानंतर अखेर शांत झाले. संघाकडून दुधाला दर कमी मिळतो म्हणून आंदोलन उभे राहिले होते.

यावर तोडगा म्हणून सरकारने अनुदान जाहीर केले पण त्यामध्ये अटी आणि शर्ती लादल्यामुळे सरकारने अनुदान जाहीर करून शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे असंच म्हणावं लागेल. दूध उत्पादन करणाऱ्या किती शेतकऱ्यांना अनुदानाचा फायदा होणार हा मोठा प्रश्न यानिमित्ताने उभा राहिला आहे.

अटी व शर्तीच्या या योजनेत सहभागी होण्यासाठी खासगी व सहकारी दूध संघांनी दुग्धव्यवसाय विकास आयुक्तांकडे अर्ज करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांचे बँक खाते हे त्यांच्या आधार कार्डशी, पशुधनाच्या आधार कार्डशी लिंक असणे गरजेचे आहे. सदर अनुदानाची रक्कम ३ समान हप्त्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. दूध संघांनी रोज खरेदी केलेल्या दुधाचा हिशोब दररोज अद्ययावत ठेवणे गरजेचे असेल. त्यासाठी आयुक्त शाहनिशा करून अनुदानाची रक्कम वितरीत करतील. या अटींची पूर्तता शेतकऱ्यांना आणि दूध संघांना करावी लागणार आहे.

### दुधाला २७ रूपये दराची अट

३.५ फॅट आणि ८.५ एसएनएफ साठी किमान २७ रूपये प्रतिलीटर दर दूध संघांना शेतकऱ्याना रोख किंवा बँक खात्यात जमा करणे बंधनकारक आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना प्रतिलीटर पाच रूपये अनुदान त्यांच्या बँक खात्यात डीबीटी द्वारे थेट वर्ग करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ३.५/८.५ या गुणप्रतिपेक्षा प्रती पॉईंट कमी होणाऱ्या फॅट व एसएनएफसाठी ३० पैसे कमी तर वाढ होणाऱ्या फॅट व एसएनएफसाठी ३० पैशांची वाढ करण्यात येणार आहे. यामुळे जर दुधाला २७ रूपयांपेक्षा कमी दर मिळाला तर शेतकऱ्यांना या अनुदानाचा लाभ मिळणार नाही.

### केवळ एका महिन्याच्या कालावधीसाठी मिळणार अनुदान

११ जानेवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालवधीसाठी या अनुदानाला मंजुरी देण्यात आली आहे. त्याआधी किंवा त्यानंतर विक्री करण्यात आलेल्या दुधाला अनुदान मिळणार नाही.

### सॉफ्टवेअर विकसित करण्यात येणार

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी बँकेमार्फत विशेष सॉफ्टवेअर विकसित करून त्याद्वारे अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर देण्यात येणार आहे. पण केवळ एका महिन्याच्या अनुदान योजनेसाठी हे सॉफ्टवेअर विकसित करण्यात येणार आहे हे विशेष.

### किती ठिकाणी मिळतोय २७ रूपये दर?

राज्यातील विविध जिल्ह्यात वेगवेगळा दर असून सोलापूर जिल्ह्यामध्ये ३.५ फॅट आणि ८.५ एसएनएफ साठी २४ ते २६ रूपयांच्या दरम्यान दर मिळत आहे. राज्यात सर्वात कमी दर सोलापूर जिल्ह्यात दिला जात आहे तर शेजारच्या पुणे ,अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २६ ते २७ रूपयांच्या आसपास दर मिळत आहे. ठिकाणानुसार आणि दुधाच्या आवकेनुसार दूध दर कमी जास्त होत असून बहुतांश दूध संघ २७ रूपयांपेक्षा कमी दराने दुधाची खरेदी करत आहेत. त्यामुळे खूप कमी शेतकऱ्यांना या अनुदानाचा लाभ घेता येणार आहे

# बाभूळगाव येथील आरोपींवर कारवाई करा

सुराज्य/वेळापूर

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्ष माळशिरस तालुका यांच्यावतीने, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली अरुण दळवी यांच्यावर प्राण घातक हल्ल्या हल्ल्याचा निषेध करून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन प्रांताधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज विभाग यांना देण्यात आले.**

## रिपाइंची गृहमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी




यावेळी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले, जिल्हा उपाध्यक्ष एस.एम. गायकवाड, जिल्हा सचिव रमेश धाईंजे, जिल्हा नेते नितीन मोरे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, नासिकआबा सोनवणे, सचिनभैय्या लोंढे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, भास्कर बनसोडे, बापूसाहेब पोळके, शेखर सावंत, प्रकाश गायकवाड, मारुती शिंदे, रामजी गायकवाड, दत्तात्रय वाघमारे, महादेव साबळे, दत्ता वाघमारे ,रिकेश चव्हाण, सौरभ वाघमारे, अब्बास शेख, प्रकाश कांबळे, गणेश सावंत, अभिजीत वाघमारे, विश्वजीत भालशंकर, राजेंद्र जाधव, पंकज भोसले, किशोर भोसले, संजय खरे, शरद साबळे, स्वप्निल सरवदे, संजय जाधव, संजय खरे, राहुल गायकवाड, प्रवीण देठे, राम बनसोडे, रोहन ओवाळ, सुधीर भोसले, प्रशांत बनसोडे, ऋतिक लोंढे इत्यादी. उपस्थित होते.

बाभूळगाव माळशिरस येथील बौद्ध कुटुंबातील, आयु- अरुण चंद्रभान दळवी, (वय-५६ वर्षे, धंदा-शेती, जात-हिंदू-महार) यांच्यावर जिवे मारण्याच्या उद्देशानेच बाभूळगाव मधील ५ ते ६ आरोपी यांनी अतिशय तीक्ष्ण अशा धारदार शस्त्राने नुकताच प्राण घातक हल्ला केलेला आहे. त्यात,अरुण चंद्रभान दळवी हा गंभीर जखमी झालेला आहे. यातील आरोपी यांनी यापूर्वीही या गावांमध्ये अनुसूचित जातीच्या महार (बौद्ध) समाजावरती अनेक वेळा खुनी हल्ले केलेले आहेत.

ते बहुसंख्य असल्याने, कायद्याला जुमानत नाहीत व सातत्याने बौद्ध समाजावर खुनी हल्ले करीत आहेत. तरी, यातील सर्व आरोपी यांच्यावरती महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रित कायदा (मोक्का) अंतर्गत योग्य ती कारवाई करीत, त्यांना त्वरित स्थानबद्ध करावे. अन्यथा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सर्व समाज बांधवाला सोबत घेऊन व्यापक व उग्र जनआंदोलन करण्यात येईल. यावेळी जे होईल त्या संभाव्य परिणामाची जबाबदारी केवळ आणि केवळ महाराष्ट्र शासनाचीच असेल.